www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
मराठी
# युवक आधार




मुख्य संपादक - भारती आमले उपसंपादक - श्री विलास गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश पाटील सह संपादक - श्री मुकुंद कांबळे महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 अंक : 66 शुक्रवार दि. 14 नोव्हेंबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : 8 RNI MAHMAR/2023/89514

# दिल्लीनंतर आता मुंबईच्या आकाशावर जीपीएस स्पूफिंगचे सावट

## सिग्नलमध्ये बिघाडबाबत एएआयने दिला इशारा

काही दिवसापूर्वी उड्डाण करणाऱ्या वैमानिकांना जीपीएस स्पूफिंगची समस्या येत होत्या. यामुळे अनेक विमानांच्या उड्डाणांना उशीर झाला. काही विमाने रद्द करण्यात आली होती. पूर्वी, सीमावर्ती भागात या समस्या सामान्य होत्या. दिल्लीनंतर, आता मुंबई विमानतळावरही या तांत्रिक धोक्याचा सामना करावा लागत आहे. १३ ते १७ नोव्हेंबर २०२५ दरम्यान मुंबईजवळील हवाई मार्गांवर जीपीएस सिग्नलमध्ये व्यत्ययाचा इशारा दिला आहे. यामुळे विमान नेव्हिगेशन सिस्टमची दिशाभूल होऊ शकते.



परिस्थिती पाहता, विमानात होणारे कोणतेही अपघात टाळण्यासाठी भारतीय विमानतळ प्राधिकरण (AAI) ला हा इशारा देणे भाग पडले. नवी दिल्लीजवळ जीपीएस स्पूफिंगच्या वृत्तानंतर हा इशारा देण्यात आला.

**जीपीएस स्पूफिंग म्हणजे काय?**

जेव्हा जीपीएस सिग्नलमध्ये छेडछाड केली जाते आणि बनावट स्थान पाठवले जाते तेव्हा त्याला जीपीएस स्पूफिंग म्हणतात. यामुळे प्रत्यक्ष नेव्हिगेशन डेटा बदलतो, यामुळे विमानाची प्रणाली प्रत्यक्षात मैल दूर असताना ते वेगळ्या ठिकाणी असल्याचा विश्वास करते. महत्त्वाचे म्हणजे, जॅमिंगमुळे सिग्नल पूर्णपणे ब्लॉक होतो, तर स्पूफिंगमुळे सिग्नल उपस्थित राहतो, परंतु ते फक्त खोटी माहिती प्रदान करते.

**कंपन्या आणि सामान्य जनतेवरही होतो परिणाम**

हे तंत्रज्ञान फक्त विमानांपुरती मर्यादित नाही. कंपन्या आणि सामान्य जनता दोघांनाही याचा परिणाम होऊ शकतो. त्याच्या धोक्यांमध्ये स्मार्टफोन ॲप्स चुकीचे स्थान दर्शवितात, स्थान-आधारित सेवांमध्ये व्यत्यय आणतात आणि अशा नेटवर्क किंवा पायाभूत सुविधांवर सायबर हल्ले होतात.

**जगात अशा घटना कुठे घडतात?**

GPS स्पूफिंगच्या घटना युद्धक्षेत्रात किंवा संघर्षाच्या भागात घडतात. पाकिस्तान, तुर्की, मध्य पूर्व आणि युक्रेनमध्ये, सैन्य किंवा इतर शत्रू देश जाणूनबुजून सिग्नल जाम करतात किंवा स्पूफ करतात जेणेकरून शत्रूला त्यांचे ठिकाण कळू नये, यासाठी याचा वापर केला जातो.

# संपूर्ण विहुले गावाने एकमुखी निर्णय घेऊन केला भाजपामध्ये जाहीर पक्ष प्रवेश

दैनिक युवक सध्या

बोरघर / माणगाव ( विश्वास गायकवाड ) साई पंचायत समिती गणांतर्गत विहुले गावातील काही ग्रामस्थांनी भाजपामध्ये पक्षप्रवेश केल्यानंतर उर्वरित ग्रामस्थांनी देखील विकासाच्या वाटेवर जाण्याचे निश्चित करून प्रदेशाध्यक्ष मा.रवींद्र जी चव्हाण साहेब, खासदार तथा जिल्हाध्यक्ष धैर्यशील दादा पाटील, आमदार प्रशांत दादा ठाकूर, आमदार रवीशेठ पाटील, लोकसभा प्रमुख सतीशजी धारप साहेब, माजी राजीप अध्यक्ष आस्वादशेठ पाटील यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन संपूर्ण गावाने एकमुखी निर्णय घेऊन विद्यमान ग्रामपंचायत सदस्य समीरजी महाडिक यांच्यासमवेत गावचे अध्यक्ष व गावाकमिटी, मुंबईकर मंडळाचे अध्यक्ष व कमिटी आणि ग्रामस्थ यांनी भाजपामध्ये जाहीर पक्षप्रवेश केला. यावेळी श्री.प्रमोद गणपत महाडीक अध्यक्ष, विहुले उत्कर्ष मंडळ मुंबई श्री.चंद्रकांत बालाजी कठे उपाध्यक्ष, विहुले उत्कर्ष मंडळ मुंबई श्री. गजानन विठोबा दळवी सचिव, विहुले उत्कर्ष मंडळ मुंबई श्री. विजय शंकर महाडीक, अध्यक्ष, ग्रामस्थ मंडळ विहुले, श्री. समिर सुभाष महाडीक, सचिव, ग्रामस्थ मंडळ तथा सदस्य, ग्रामपंचायत विहुले, श्री.विश्वास केशव महाडीक, ग्रामस्थ, श्री.प्रशांत पंढरीनाथ महाडीक ग्रामस्थ, श्री.अरविंद मोतीराम दळवी ग्रामस्थ, श्री. सुभाष तुकाराम दळवी ग्रामस्थ, श्री. मधुकर दामोदर महाडीक यांनी जाहीर पक्षप्रवेश केला.यावेळी माणगाव तालुकाध्यक्ष परेश सांगले, उपाध्यक्ष सुधीरजी म्हामुणकर, साई विभाग उपाध्यक्ष निलेशजी दळवी, जनार्दन महाडिक जी उपस्थित होते.या पक्षप्रवेशामुळे संघटनेला साई विभागात अधिक बळकटी मिळाली असून गावच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपा कटीबद्ध असल्याचे विभागीय उपाध्यक्ष निलेश दळवी यांनी सांगितले.



# समाजोपयोगी उपक्रमांना अनन्य साधारण महत्व - लोकनेते रामशेठ ठाकूर

## अस्थायी वाहन पार्किंग सेवेचे लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उदघाटन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

लोकांसाठी काम करण्याची जाणीव म्हणजेच सामाजिक बांधिलकी असते त्यामुळे समाजोपयोगी उपक्रमांना अनन्य साधारण महत्व आहे, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी नवीन पनवेल येथे केले.

माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, वाहतूक पोलीस विभाग, नवीन पनवेल वेल्फेअर असोसिएशन यांच्या पुढाकारातून पनवेल रेल्वे स्थानकातील नवीन पनवेल बाजूस उभारण्यात आलेल्या अस्थायी वाहन पार्किंग सेवेचे उदघाटन तसेच हेल्मेट आणि वाहतूक पोलीस मित्र ओळखपत्राचे वाटप लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

कामाची आस्था असेल तर काम करणे सोपे होते. माझ्या आयुष्यातील ७५ वर्षे पूर्ण होत आहेत, तरीसुद्धा सामाजिक कार्य केल्याशिवाय स्वस्थ बसता येत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देशाच्या आणि राज्याच्या विकासासाठी प्रचंड मेहनत घेत आहेत. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आपणही सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून समाजासाठी कार्यरत राहिले पाहिजे. 'केल्याने होत आहे आधी केलेच पाहिजे' या भावनेतून प्रत्येकाने समाजकार्यात आपला वाटा उचलला पाहिजे,असेही त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी . देशमुख, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील, नवीन पनवेल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, कार्यक्रमाचे आयोजक माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, माजी नगरसेविका सुशीला घरत, माजी नगरसेवक अजय बहिरा, उमेश इनामदार, प्रशांत फुलपगार, सुधाकर थवई, विजय म्हात्रे, डॉ. अस्मिता घरत, नवीन पनवेल वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष ए. सी. झुल्का, श्री. देसाई यांच्यासह नागरिक उपस्थित होते.




लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुढे बोलताना सांगितले कि, वाहतुकीची वर्दळ पाहता वाहन पार्किंग अपुऱ्या पडत आहेत. त्यामुळे वाहतूक पोलीस अधिकारी औदुंबर पाटील, माजी नगरसेवक मनोज भुजबळ व संदीप पाटील, वेल्फेअर असोसिएशन यांनी रेल्वेशी समन्वय साधून अस्थायी स्वरूपात पण चांगल्याप्रकारे पार्किंग सेवा उपलब्ध करून दिली आहे, त्यामुळे हा समाजोपयोगी चांगला उपक्रम असल्याचे अधोरेखित केले. तसेच सर्वांनी वाहतुकीचे नियम व शिस्त पाळावी, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी वाहतुकीचे नियम या विषयावर मार्गदर्शन केले. तर प्रास्ताविकातून संदीप पाटील यांनी या पार्किंगसंदर्भात माहिती दिली.

# शनिवारी पनवेलमध्ये साहित्यिकांचा गौरव सोहळा आणि कवी संमेलनाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी )** श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल व पनवेल शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी पनवेलमध्ये साहित्यिकांचा गौरव सोहळा करण्यात आले आहे.



माजी खासदार अध्यक्षतेखाली होणाऱ्या य सुप्रसिद्ध हास्य कवी अशोक म्हात्रे, ज्येष्ठ गझलकार ए.वे आहेत.शनिवार दि.१५ नोव्हें वाजता पनवेलच्या मार्केटया सामाजिक विकास मंडळ स आहे.या सोहळ्यात लोकनेते माजी खासदार यांना आपल्या ७५ व्या वर्षात पदार्पण केल्याबद्दल त्यांचा सत्कार तसेच साहित्यिकांचा सत्कार आणि कवी संमेलन संपन्न होणार आहे. सहभागी कवींना प्रमाणपत्र आणि स्मृतीचिन्ह आयोजकांच्यावतीने दिले जाणार आहे. या सोहळ्यासाठी रसिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी,पनवेल शाखेचे अध्यक्ष सुभाष कुडके यांनी केले आहे.

# उरण मध्ये नगरपरिषदेच्या निवडणुकीचे बिगुल वाजले !

## भाजप महायुतीच्या मेघावादळाचा झंजावात

**दैनिक युवक आधार**

**महराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील** नगरपरिषदेच्या निवडणुकीचे बिगुल वाजल्या नंतर गेली तीन दिवस उरण शहरातील राजकारणात वादळापूर्वीची शांतता पसरली होती आज दि.13 नोव्हेंबर 2025 शहरात भाजप महायुतीचा मेघावादळाचा झंजावात पहावयास मिळाला. आज सकळी 11:00 वाजल्यापासून उरण शहराच्या वेशीवर असणाऱ्या श्री राघोबादेव मंदिराच्या परिसरात हळूहळू या वादळाचा झंजावात जणवू लगला आणि काही क्षणातच या झंजावाताचे रुपांतर मेघा वादळात होवून गगनभेदी घोषणांच्या तडाख्यात भाजप महायुतीच्या कार्यकर्त्यांची घोडदौंड नगरपरिषद कार्यालयाच्या बाजूने आगेकूच करू लागली .या झंजावात राज्याचे सांस्कृतिकमंत्री ना.आशिष शेलार, उरणचे आमदार महेश बालदी,पनवेलचे आमदार,प्रशांतठाकूर.भाजपचे अविनाश कोळी. जे.एम म्हात्रे.रवी भोईर,नवीन राजपाल,सौ.सीमा घरात यांच्या सह असंख्य पदाधिकारी,कार्यकर्ते या महारॅलीच्या झंजावात सामील झाले होते.सदर महारॅली श्रीराघोबामंदिर येथून मंदिरात कोटकर ग्रामस्थांचे आराध्यदैवत असणाऱ्या श्री राघोबादेवाला नमस्कार करून व आशीर्वाद घेवून या महारॅलीचा झंजावात संपूर्ण उरण शहरांतून फिरून उरण नगरपरिषद कार्यालयात उमेदवारी अर्जदाखल करण्या साठी उपस्थितराहिला

आजभाजपा महायुतीच्या वतीने नगराध्यक्ष पदासाठी सौ.शोभा कोळी शाह यांनी तर इतर 21 उमेदवारानी यावेळी नगरसेवक पदासाठी आपले





उमेदवारी अर्ज दाखल केले यावेळी उपस्तीत असणारे राज्याचे सांस्कृतिकमंत्री ना.आशिष शेलार यांनी पत्रकारान बरोबर बोलताना स्पष्ट केले की या झंझावाताने विरोधकाचे मनसुबे उधळेअसून येत्या 2 डिसेंबर रोजी ही निवडणूक होत आहे त्यामुळे भाजप महायुतीच्या मेघावादळाचा झंजावात नक्कीच मतदारांवर पडला असून मताधिक्याने भाजप महायुतीचे उमेदवार निवडून येतील आणि तीन तारखेला निवडणूक निकाल असल्यानेविरोधकांचे तीन चोक तेरा होतील यात शंका नाही असे ते शेवटी म्हणाले

# 800 ग्रॅम वजनाच्या अकाली जन्मलेल्या बाळाची मृत्यूशी झुंज यशस्वी

## नवी मुंबईतील मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये यशस्वी उपचार - ७ आठवडे एनआयसीयुमध्ये केले उपचार




**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

प्रसूतिपूर्व गुंतागुंतीमुळे ४१ वर्षीय महिलेची मुदतपूर्व प्रसूती करावी लागली. अवघ्या २८ व्या आठवड्यात बाळाचा जन्म झाला. त्याचे वजन केवळ ८०० ग्रॅम होते. मुदतपूर्व जन्म असल्याने त्या बाळाला अनेक शारीरिक समस्या जाणवत होत्या. या बाळावर खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये यशस्वी उपचार करण्यात आले असून डॉक्टरांच्या अथक प्रयत्नांनंतर अखेर त्या बाळाची मृत्यूशी झुंज यशस्वी ठरली.

खारघर येथील मेडिकव्हर हॉस्पिटलमधील नवजात शिशु अतिदक्षता विभागात (एनआयसीयू) ७ आठवडे उपचार घेतल्यानंतर या बाळाच्या प्रकृतीत सुधारणा झाली आहे. बाळाला गंभीर श्वसन सिंड्रोम, सेप्सिस, श्वसनक्रियेत अडथळे येणे, अशक्तपणा, चयापचय समस्या तसेच हाडांचा आजार आणि ब्रोन्कोपल्मोनरी डिस्प्लेसिया (बीपीडी) यांचा सामना करावा लागला. मेडिकव्हर हॉस्पिटलचे नवजात शिशु तज्ज्ञ आणि एनआयसीयू इन्चार्ज डॉ. तन्मेष कुमार साहू यांच्या नेतृत्वाखाली टीमने ही गुंतागुंतीची केस हाताळली. आज हे बाळ सामान्य श्वासोच्छवास करत असून स्तनपानाचाही स्विकार करत आहे त्याच्या वयानुसार विकासाचे टप्पे गाठत आहे. खारघर येथील ४१ वर्षीय रहिवासी श्रीमती वृषाली पवार( * रुग्णाचे नाव बदलले आहे) यांनी १४ ऑगस्ट २०२५ रोजी अकाली बाळाला जन्म दिला. गंभीर प्रीक्लेम्पसिया आणि मागील सिझेरियनमुळे तसेच हाय रिस्क प्रेग्नेन्सीमुळे २८ आठवड्यातच अकाली प्रसुती करण्यात आली. बाळाच्या हृदयाची गती प्रति मिनिट १०० बीट्सपेक्षा कमी आणि रक्त चाचण्यांमध्ये तीव्र श्वसन विकार आढळून आल्याने बाळाला त्वरीत अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले. मेडिकव्हर हॉस्पिटलचे नवजात शिशु तज्ज्ञ आणि एनआयसीयू इन्चार्ज डॉ. तन्मेष कुमार साहू सांगतात की, काही तासांतच बाळाला रेस्पिरेटरी डिस्ट्रेस सिंड्रोम (आरडीएस) असल्याचे निदान झाले, जो अकाली जन्मलेल्या बाळांमध्ये फुफ्फुसाचा एक गंभीर आजार आहे. बाळाला त्याकरिता विशेष थेरपी देण्यात आली, यात एक औषध जे थेट फुफ्फुसांमध्ये दिले जाते जेणेकरून त्यांना ऑक्सिजन क्षमता वाढविण्यास आणि सुधारण्यास मदत होईल. बाळाला दीर्घकालीन फुफ्फुसाच्या आजाराची सुरुवातीची लक्षणे दिसली म्हणून, क्लिनिकल पुराव्यांनुसार, स्टिरॉइड थेरपी 10 दिवसांसाठी सुरू करण्यात आली. डॉ. साहू पुढे सांगतात की, एनआयसीयूमध्ये असताना बाळाला सेप्सिस देखील झाला आणि त्याच्यावर प्रगत अँटीबायोटिक्सचा उपचार करण्यात आला. त्याला रक्त संक्रमणांची आवश्यकता होती आणि चयापचय समस्या, हाडांचे आजार, कावीळ आणि स्तनपानाकरिता त्याचे काळजीपूर्वक निरीक्षण केले गेले. बाळाच्या पोषणाकरिता टोटल पॅरेंटरल न्यूट्रिशन (टीपीएन) ने सुरूवात झाली आणि हळूहळू स्तनपानास सुरुवात झाली. तिसऱ्या दिवसापासून कांगारू मदर केअर (केएमसी) सुरू केले, ज्याने बाळाच्या विकासात्मक आणि भावनिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावली. कालांतराने, ४२ व्या दिवसापर्यंत बाळाला ऑक्सिजन सपोर्टवरुन काढण्यात आले आणि ४५ व्या दिवसापर्यंत त्याने तोंडावाटे आहार देण्यात आला आणि बाळाच्या आरोग्याबाबत हा एक महत्त्वाचा टप्पा ठरला. उपचाराच्या ९ व्या दिवसापर्यंत, बाळाला श्वसनाचा आधार पूर्णपणे बंद करावा लागला आणि १ ऑक्टोबर २०२५ रोजी यशस्वीरित्या घरू सोडण्यात आले. त्याची प्रकृती स्थिरावली होती व तो सामान्यपणे स्वतः श्वास घेत होता. नियमित फॉलोअपने बाळाची वाढ, हाडांचे आरोग्य आणि विकासाचे निरीक्षण केले जाईल. संसर्ग रोखणे, योग्य पोषण सुनिश्चित करणे आणि बाळाच्या वाढीला पाठिंबा देणे यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. आमचे बाळ अकाली जन्मल्याने ते अशक्त होते. सुरुवातील त्याची प्रकृती पाहून आम्हाला आमचे बाळ की वाचेल की नाही याची भीती वाटली. त्याला अशा अवस्थेत पाहणे आमच्यासाठी खुप त्रासदायक होते. परंतु मेडिकव्हरमधील डॉक्टर आणि परिचारिकांनी हार मानली नाही. त्यांनी आमच्या बाळाला नवे आयुष्य मिळवून दिले अशी प्रतिक्रिया बाळाची आई श्रीमती वृषाली पवार यांनी व्यक्त केली.

# भीम शाहीर प्रबोधनकार प्रदीप बागवान कडबे यांना त्याग मूर्ती रमाई गौरव पुरस्कार -2025 वर्धा येथे सन्मानित.

**दैनिक युवक आधार**

संजीव भांबोरे नागपूर वार्ताहर –वर्धा ऑडिओ टॉनिक ( साऊंट अन्ड लाईटस ) प्रतिष्ठान, कवी के पाटील द्वारा आयोजित, सावित्रीबाई फुले पुरस्काराने सन्मानित दिवंगत मंदाताई के पाटील यांच्या स्मरणार्थ दिनांक –10 नोव्हेंबर 2025 रोज सोमवारला सायंकाळी 6 वाजता विजया हॉल सावंगी मेघे वर्धा, येथे मोठ्या उत्साहात पार पडला. नागपूर जिल्ह्यातील रामटेक तालुक्यातील किरणापुर ( काचुरवाही ) भीम शाहीर प्रबोधनकार प्रदीप बागवान कडबे यांना रमाई गौरव पुरस्कार 2025 सन्मान चिन्ह प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध प्रबोधनकार विकास राजा, प्रबोधनकार सुभाष कोठारे, महाराष्ट्राच्या सुप्रसिद्ध गायिका प्रबोधनकार निशा धोंगडे, महाराष्ट्राच्या सुप्रसिद्ध गायिका प्रमोदिनी साठे, महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कवी गायक संगम कासारे, सुप्रसिद्ध गायिका वैशाली शेंडे, सुप्रसिद्ध गायक क्रांती मीनल, सुप्रसिद्ध गायक सदानंद मोरे अकोला, सुप्रसिद्ध गायक दिलीप शितोडे, सुप्रसिद्ध गायक क्रांती कुमार पंडित, सुप्रसिद्ध गायक राजेश भारती,



सुप्रसिद्ध गायिका योजना कुकुडकर, गायिका मंदा वाघमारे, महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कवी गायक, दयानंद इंगळे, जीवतु चव्हाण, शिवाजी कांबळे, प्रबोधनकार मधुबावलंकार तेलंगणा, सुप्रसिद्ध गायक अरुण मेश्राम, कार्यक्रमाचे मुख्य संयोजक – महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कवी के पाटील प्रबोधनकारकला साहित्य संघ वर्धा, सर्व गायक कलावंताचे आभार मानून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या, मोठ्या संख्येने गायक कलावंत उपस्थित होते.

# खोपोली नगरपरिषद निवडणूक २०२५ साठी तयारीचा जिल्हाधिकाऱ्यांचा सखोल आढावा

## लोकशाहीवरील विश्वास अबाधित ठेवणे ही प्रशासनाची जबाबदारी - प्रत्येक मतदाराला निर्भय मतदानाचा अधिकार मिळावा यासाठी सर्व यंत्रणा दक्ष राहतील - जिल्हाधिकारी किशन जावळे

**दैनिक युवक आधार**

**खालापुर-** संतोष शेवाळे खोपोली नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ पारदर्शक, सुरक्षित आणि सुरळीत पार पाडण्यासाठी रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी १२ नोव्हेंबर रोजी खोपोली नगर परिषदेची पाहणी करून निवडणुकीच्या तयारीचा सविस्तर आढावा घेतला.



या पाहणीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी सर्वप्रथम स्ट्रॉंग रूम आणि मतमोजणी केंद्र यांची पाहणी केली. मतदानानंतर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (EVM) ठेवण्यात येणाऱ्या स्ट्रॉंग रूममध्ये २४ तास सीसीटीव्ही नियंत्रण, पोलिस सुरक्षा, अग्निशमन यंत्रणा, पर्यायी वीजपुरवठा व्यवस्था आणि कडक प्रवेश नियंत्रण या सुरक्षेच्या सर्व बाबींची तपासणी करण्यात आली.

यानंतर त्यांनी मतमोजणी केंद्र पाहून तेथील टेबल नियोजन, कर्मचारी नियुक्ती, सुरक्षा उपाययोजना आणि माध्यम प्रतिनिधींसाठीच्या सुविधा यांचा सविस्तर आढावा घेतला. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, शिस्तबद्ध आणि कायद्याच्या चौकटीत राहून पार पाडण्यासाठी त्यांनी अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना आणि मार्गदर्शन दिले.

जिल्हाधिकारी किशन जावळे म्हणाले की, निवडणूक ही लोकशाहीची मूलभूत प्रक्रिया आहे. नागरिकांचा लोकशाहीवरील विश्वास अबाधित ठेवणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. प्रत्येक मतदाराला सुरक्षित आणि निर्भय वातावरणात मतदान करता यावे, यासाठी सर्व यंत्रणा सज्ज राहतील.

या भेटीदरम्यान रायगड जिल्हा पोलिस अधीक्षक आचल दलाल उपस्थित होत्या. त्यांनी निवडणुकीदरम्यान सुरक्षा यंत्रणेच्या तयारीचा आढावा घेतला आणि पोलिस तैनाती व शिस्तीबाबत सूचना दिल्या.

या प्रसंगी निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (कर्जत) प्रकाश संकपाळ, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार (खालापूर) अभय चव्हाण, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी (खोपोली नगर परिषद) पंकज पाटील, तसेच वरिष्ठ पोलीस निरीक्षक उपस्थित होते.

जिल्हाधिकारी जावळे यांच्या या पाहणीमुळे निवडणूक प्रशासन सज्ज झाले असून, खोपोलीतील नगर परिषद निवडणूक सुरक्षित आणि पारदर्शक रितीने पार पडेल, असा विश्वास नागरिक आणि अधिकारी वर्गांतून व्यक्त केला जात आहे.

# 10 मिटर पिस्टलमध्ये पटकावले सुवर्ण पदक

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: 9 नोव्हेंबर ते 11 नोव्हेंबर दरम्यान मुंबई युनिव्हर्सिटी झोन 1 ही स्पर्धा प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल शहाजीराजे रोड, विलेपारले येथे संपन्न झाली. या शूटिंग स्पर्धेत 10 मिटर एअर पिस्टल मध्ये वीर वाजेकर एएससी कॉलेज, फुंडे उरण येथिल विद्यार्थी गौरव ठाकूर चिरनेर, उरण याने 10 मिटर पिस्टलमध्ये सुवर्ण पदक पटकावले. त्यामुळे त्याचे सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. गौरव सध्या सिद्धांत रायफल क्लब रायगड, पनवेल येथिल असणाऱ्या इंडियन मॉडेल स्कूल अँड जुनिअर कॉलेजच्या शूटिंग रेंज वर प्रशिक्षक राष्ट्रीय नेमबाज किशन खारके व अलंकार कोळी ह्यांच्याकडे नेमबाजीचे प्रशिक्षण घेत आहे. त्याच्या या यशाबद्दल वीर वाजेकर एएससी कॉलेज फुंडेचे प्राचार्य व स्पोर्ट्सचे प्रशिक्षक यांनी पुढील राष्ट्रीय युनिव्हर्सिटी शूटिंग स्पर्धेकारिता अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.



# सत्ता असो, नसो ; टीआरपी ठाकरे बंधूंकडेच !


१९ जून १९६६ रोजी मराठी माणसाच्या न्याय्य हक्कांसाठी श्री. बाळ केशव ठाकरे उर्फ बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेची स्थापना केली. या शिवसेनेचे हीरक महोत्सवी वर्ष आहे. या साठ वर्षांत शिवसेनेने अनेक उन्हाळे, हिवाळे, पावसाळे पाहिले. अनेक चढ उतार पाहिले. अनेक संकटे पचविली, अनेकदा महाराष्ट्राच्या हितासाठी रस्त्यावर उतरून संघर्ष केला, आंदोलने केली. अनेक जण सोडून गेले. नवनवीन अनेक जण मातोश्रीवर मुजरा करायला आले. १९९५ साली राज्यात, केंद्रात सत्तेत शिवसेना सहभागी झाली. अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी यांच्या पासून तर नरेंद्र दामोदरदास मोदी, देवेंद्र गंगाधरराव फडणवीस यांना सत्तेसाठी 'हात' दिला. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अनेक ठिकाणी शिवसेनेने सत्ता काबीज केली. शिवसेनेच्या खांद्यावर उभे राहून भारतीय जनता पक्ष गगनाला गवसणी घालता झाला. पण हे करतांना ज्या खांद्याने आपल्याला मोठे केले त्यांनाच खांदा देण्याचे षडयंत्र रचण्यात आले. १७ नोव्हेंबर २०१२ रोजी हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे महानिर्वाण झाले. परंतु त्यानंतरही शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी आपले नेतृत्व सिद्ध केले. शिवसेनेच्या इतिहासात बाळासाहेब ठाकरे यांनी अनेक दगडांना शेंदूर फासले, हे दगड स्वतःलाच देव मानायला लागले. अनेक नाक्यावरच्या तरुणांना शिवसेनेत आणून मोठमोठी पदे दिली परंतु तेच एहसान फरामोश निघाले. याच दरम्यान स्वरराज श्रीकांत ठाकरे उर्फ राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांच्या समवेत मतभेद झाले म्हणून शिवसेनेशी काडीमोड घेत स्वतःचा महाराष्ट्र नवनिर्माण सेना हा पक्ष स्थापन केला. ठाकरे ब्रॅण्ड असल्याने त्यांना लोकांनी उचलून धरले. रमेश किणी प्रकरणावरुन जे ज्येष्ठ पत्रकार राज ठाकरे यांना तुरुंगात घालण्यासाठी देव पाण्यात घालून बसले होते तेच ज्येष्ठ पत्रकार राज ठाकरे शिवसेनेतून बाहेर निघून महाराष्ट्र नवनिर्माण सेना स्थापन करते होताच आणि त्यांच्या दादरच्या शिवतीर्थावरील सभेला प्रचंड प्रतिसाद मिळताच "तोच आवेश, तोच आवाज, तीच गर्दी, तेच वक्तृत्व" अशा शब्दांत तोंड फाटेस्तोवर स्तुतीसुमने उधळतांना जनतेने पाहिले आहे. १३ ऑगस्ट १९६० रोजी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे व्यंगचित्रकार बाळासाहेब ठाकरे यांनी मार्मिक हे जागतिक पातळीवरील पहिले मराठी व्यंगचित्र साप्ताहिक सुरु करुन झोपलेल्या मराठी माणसाला खडबडून जागे केले. कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते, तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव बळवंतराव चव्हाण यांच्या शुभहस्ते या 'मार्मिक'चे प्रकाशन करण्यात आले. त्यावेळेपासून बाळासाहेब ठाकरे आणि श्रीकांत ठाकरे हे संपादक आणि सहसंपादक म्हणून मार्मिक मध्ये कार्यरत होते. आजही बाळासाहेब ठाकरे आणि श्रीकांत ठाकरे यांची नांवे मार्मिक मध्ये प्रसिद्ध होत आहेत. बाळासाहेब ठाकरे यांचे रमेश ठाकरे हे आणखी एक बंधू होते. परंतु ते स्वतंत्र रहात होते. आरोळी नांवाचे त्यांचे साप्ताहिक होते. तीनही बंधू अर्थात ठाकरे सर्वच कलाकार, व्यंगचित्रकार, छायाचित्रकार. सारेच दूरदृष्टी आणि कल्पक विचार करीत विकासाचा आराखडा तयार करण्यात वाकबगार. राज ठाकरे यांनी शिवसेनेतून २००६ साली बाहेर पडून महाराष्ट्र नवनिर्माण सेना स्थापन केली. तेंव्हा पासून मतभेदांची, टीकेची राळ उडत होती. शिवसेनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात शिवसेना आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना एकत्र आली असती तर मुख्यमंत्रीपद शिवसेनेकडे आणि उपमुख्यमंत्रीपद महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या हातात आले असते. परंतु नियतीला हे मंजूर नसावे. राजकीय उलथापालथ झाली. पक्ष फोडून सत्ता हस्तगत करण्याच्या खेळी झाल्या. आणि त्रिभाषा सूत्रीने डोकं वर काढलं. हिंदी सक्तीचा मुद्दा पुढे आला. मराठीवर अन्याय होऊन हिंदी बोडक्यावर बसू नये म्हणून भारतीय जनता पक्ष आणि मित्रपक्ष वगळता सर्व राजकीय पक्ष एकवटले. उद्धव आणि राज ठाकरे बंधूंनी हातात हात घेत मोर्चा काढण्याची घोषणा करताच हिंदी सक्तीचा शासन निर्णय मागे घेण्यात आला. मग मोर्चाचे रूपांतर विराट मेळाव्यात झाले. अवघ्या मराठी जनतेच्या डोळ्याचे पारणे फिटले. मराठी माणूस आनंदला. उभा महाराष्ट्र आनंदविभोर झाला. त्या ५ जुलै २०२५ पासून ठाकरे बंधू अनेकदा एकत्र येऊन भेटू लागले, चर्चा करु लागले, कौटुंबिक कार्यक्रमात सहभागी होऊ लागले. मातोश्री ते शिवतीर्थ हे अंतर कमी होत होत जवळ जवळ आले. गणपतीच्या दर्शनाला मातोश्री शिवतीर्थावर आली. तर शिवतीर्थ मातोश्री जवळ आले. 'राज'माता मधुवंती श्रीकांत ठाकरे यांच्या भेटीसाठी भाचा/पुतण्या उद्धव आणि परिवार शिवतीर्थावर डेरेदाखल झाला. भाऊबीजेसाठी 'राज'भगिनी जयजयवंती ठाकरे देशपांडे यांच्या दादरच्या निवासस्थानी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे आपापल्या कुटुंबियांसमवेत आले आणि देवदुर्लभ सोहोळा झाला. आजच्या घडीला ना उद्धव ठाकरे सत्तेत, ना राज ठाकरे सत्तेत पण माध्यमांमध्ये आजच्या परिभाषेत टीआरपी ठाकरे बंधूंकडेच असल्याचे /वाढल्याचे दिसून येत आहे. बाळासाहेब ठाकरे, श्रीकांत ठाकरे, उद्धव ठाकरे, राज ठाकरे, आदित्य ठाकरे, अमित ठाकरे, तेजस ठाकरे या ठाकरे बंधूंभोवतीच टीआरपी फिरतोय. बाळासाहेब ठाकरे आणि श्रीकांतजींच्या काळात वृत्तवाहिन्यांचा सुळसुळाट नव्हता पण आज उद्धव आणि राज, आदित्य आणि अमित या ठाकरे बंधूंना माध्यमांनी अक्षरशः घेरल्याचे दिसून येते. अरे, या बंधूंना त्यांचे व्यक्तीगत आयुष्य नावाची गोष्ट आहे की नाही ? प्रत्येक वेळी कॅमेरा त्यांच्याच भोवती. एकदा राज ठाकरे प्रसाधनगृहाकडे निघाले असतांना छायाचित्रकार अवतीभवती होते तेंव्हा, "अरे, इथे तरी मला एकट्याला सोडा. की तिथे पण येताय ?" अशा आपल्या खास ठाकरी शैलीत त्यांनी सुनावल्याचे कळते. माध्यमांनी जरा तारतम्य बाळगावे असे वाटते. ब्रेकिंग न्यूजच्या धबडग्यात आपण काय करतो आहोत, हेच कळेनासे झाले आहे. एक मात्र नक्की की आज सत्तेवर असो की नसो टीआरपी हा ठाकरे बंधूंकडेच असल्याचे सिद्ध झाले आहे. ही ठाकरे बंधूंची घोडदौड सर्वत्र निखळ, शुद्ध भगवा फडकविल्याशिवाय राहणार नाही हे निःसंशय ! जय महाराष्ट्र !

–योगेश वसंत त्रिवेदी, .

(लेखक हे ज्येष्ठ राजकीय विश्लेषक आहेत.)*



राज ठाकरे शिवसेनेतून बाहेर निघून महाराष्ट्र नवनिर्माण सेना स्थापन करते होताच आणि त्यांच्या दादरच्या शिवतीर्थावरील सभेला प्रचंड प्रतिसाद मिळताच "तोच आवेश, तोच आवाज, तीच गर्दी, तेच वक्तृत्व" अशा शब्दांत तोंड फाटेस्तोवर स्तुतीसुमने उधळतांना जनतेने पाहिले आहे. १३ ऑगस्ट १९६० रोजी आंतरराष्ट्रीय कीर्तीचे व्यंगचित्रकार बाळासाहेब ठाकरे यांनी मार्मिक हे जागतिक पातळीवरील पहिले मराठी व्यंगचित्र साप्ताहिक सुरु करुन झोपलेल्या मराठी माणसाला खडबडून




# मुरुड नगरपरिषद निवडणुकीसाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष सज्ज

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या उपस्थितीत उमेदवारांची घोषणा केली आराधना दांडेकर नगराध्यक्षपदाच्या रिंगणात रायगड जिल्ह्यातील मुरुड नगरपरिषद निवडणुकीसाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीने अजित पवार गटांनी उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली आहे. बुधवारी मुरुड येथे झालेल्या विशेष बैठकीत माजी आमदार अनिकेत तटकरे यांच्या उपस्थितीत जाहीरनाम्याचा कार्यक्रम पार पडला. या बैठकीत थेट नगराध्यक्ष पदासाठी माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर यांच्या कन्या आराधना मंगेश दांडेकर यांचे नाव जाहीर करण्यात आले.उच्च शिक्षण घेतलेल्या आणि शहराच्या सामाजिक, शैक्षणिक घडामोडींशी निगडित असलेल्या आराधना दांडेकर यांची उमेदवारी ही मुरुड नगरपालिकेच्या इतिहासातील सर्वात तरुण नगराध्यक्ष उमेदवार म्हणून नोंदवली जात आहे. माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर यांचे शहरातील सर्व स्तरांतील नागरिकांशी असलेले घनिष्ठ संबंध आणि कार्यकर्ता वर्गाशी असलेली जवळीक हा त्यांच्या कन्येच्या प्रचार मोहिमेला बळ देतील, असा विश्वास पक्षाच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे.या प्रसंगी बोलताना माजी आमदार अनिकेत तटकरे म्हणाले, “मुरुड नगरपरिषद निवडणुकीसाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीने जाहीर केलेले सर्व उमेदवार हे जनमानसात परिचित आहेत. सामाजिक भान आणि कार्यतत्परता असलेल्या या सर्व उमेदवारांवर मतदार विश्वास दाखवतील, असा मला विश्वास आहे. मुरुड नगरपरिषदेवर राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि मित्र पक्षांचा झेंडा पुन्हा फडकणार आहे.”तटकरे यांनी सर्व कार्यकर्त्यांना आवाहन केले की, “प्रत्येक कार्यकर्त्याने घराघरात पोहोचून उमेदवारांविषयी जनजागृती करावी, विकासाच्या कामांची माहिती द्यावी आणि पक्षाच्या विजयासाठी अथक परिश्रम घ्यावेत.”उपस्थित मान्यवर आणि पहिली उमेदवार यादीकार्यक्रमाला मुरुड तालुका अध्यक्ष फैरोज घलट्रे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन मनोज भगत, सचिव विजय पैर, शहर अध्यक्ष संजय गुंजाळ, माजी नगरसेवक प्रकाश सरपाटील, वासंती उमरोटकर,



विश्वास चव्हाण, हसमुख जैन आदींसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. घोषित उमेदवारांची यादी पुढीलप्रमाणे आहे:प्रभाग 2 अ – प्रिता चौलकर,प्रभाग 2 ब – राकेश मसाल,प्रभाग 3 ब – माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर ,प्रभाग 4 अ – माजी नगरसेवक विश्वास चव्हाण,प्रभाग 4 ब – तरनुम फराश,प्रभाग 5 अ – प्रमिला माळी,प्रभाग 5 ब – तमिम धाकम,प्रभाग 6 ब – शबाना सुर्वेप्रभाग 7 अ – वासंती उमरोटकर,प्रभाग 7 ब – अमित कवळे,प्रभाग 8 ब – अँड. मृणाल खोत,प्रभाग 10 ब – अध्यक्ष हसमुख जैन,मुरुडच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नमुरुड तालुका आणि नगर परिषद क्षेत्रातील विकासकामांबाबत तटकरे यांनी सांगितले की, “राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीने नेहमीच मुरुडच्या विकासाला प्राधान्य दिले आहे. खासदार सुनील तटकरे आणि मंत्री आदिती तटकरे यांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचा निधी मुरुडच्या विविध विकास प्रकल्पांसाठी मंजुरीस मिळाला आहे आणि आगामी काळातही विकासाचे दरवाजे उघडे राहतील."तटकरे यांच्या उपस्थितीत झालेला उमेदवार जाहीरनाम्याचा कार्यक्रम ही निवडणुकीतील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या तयारीची औपचारिक सुरुवात मानली जात आहे.

दैनिक युवक आधार हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# देव तोरणे येथे श्री कालभैरवनाथ जन्माष्टमी उत्सव भक्तीमय वातावरणात साजरा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी डॉ.देवेंद्र ओव्हाळ**

**श्री क्षेत्र देवतोराणे (ता. खेड, जि. पुणे)** – श्री क्षेत्र देवतोराणे (बु.) येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही श्री कालभैरवनाथ जन्माष्टमी उत्सव मोठ्या उत्साहात व भक्तीभावाने साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम बुधवार, दि. १२ नोव्हेंबर २०२५ रोजी पार पडला असून पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. सकाळी अभिषेक, स्नान व महाआरतीने उत्सवाची सुरुवात झाली. दुपारी हरिपाठ व होमहवन कार्यक्रम पार पडले, तसेच संध्याकाळी कीर्तनसेवा आणि रात्री पालखी सोहळा मोठ्या जल्लोषात पार पडला. या प्रसंगी कीर्तनसेवा भागवताचार्य रामायणाचार्य ह.भ.प. संतोष महाराज ताजणे (देवाची आळंदी) यांच्या द्वारे संपन्न झाली. कार्यक्रमाचे सौजन्य स्मरणार्थ कै. ताराई नामदेव देवाडे व श्री. बाळासाहेब नामदेव देवाडे (मा. उपसरपंच) यांचे योगदान राहिले. उत्सवाच्या आयोजनासाठी समस्त



गुरव समाज देवतोरणे, कै. बबन लक्ष्मण गोसावी ( समस्त गोसावी परिवार खरपुडी) कै विष्णू महादु शिंदे यांच्या स्मरणार्थ मा सरपंच संभाजी शिंदे यांच्या व श्री. बाळासाहेब गोपाळे यांचे विशेष सहकार्य लाभले. यावेळी मंदिर परिसरात आकर्षक लाईट डेकोरेशन व साऊंड सिस्टीमची सुंदर व्यवस्था करण्यात आली होती. या उत्सवात निमित्ताने प्रमुख उपस्थिती खेड तालुक्याचे लोकप्रिय आमदार मा.श्री बाबाजीशेठ रामचंद्र काळे समवेत उप तालुकाप्रमुख सुभाष शेठ मांडेकर, शहर प्रमुख संतोष (पप्पू) राक्षे, विभाग प्रमुख अमोल दादा पाचपुते, सरपंच नितीन रायकर, राहुल मलगे, चंद्रकांतशेठ सातपुते, ग्रा.सदस्य महेशभाऊ शेटे पं.समिती इच्छुक उमेदवार सौ. सारिकाताई अर्जुन गोगावले
युवा नेते मा.जिल्हा परिषद सदस्य मा.श्री अतुल भाऊ देशमुख समवेत खजिनदार श्री गणेश दादा चोरघे, पं.समीती इच्छुक उमेदवार सौ.जयाताई रणजित भोकसे
जिल्हा परिषद इच्छुक उमेदवार सौ.सुनीताताई शरदभाऊ बुट्टेपाटिल, श्री जयसिंग शेठ दरेकर, पं.समिती इच्छुक उमेदवार सौ.पल्लवीताई जयसिंग दरेकर समवेत अनेक गावचे सरपंच,उपसरपंच, चेअरमन, युवा नेते आणि किर्तनकार गायनाचार्य मृदंगाचार्य श्रोते मंडळी समवेत खेड तालुक्यातील वारकरी संप्रदाय उपस्थित होता यावेळी
यावेळी श्री क्षेत्र देवतोरणे गावच्या सरपंच सौ.विजयाताई प्रभू देवाडे उपसरपंच सौ.सुनिताताई गोविंद कलवडे मा.सरपंच गौतम आवारी, मा सरपंच श्री संभाजी शिंदे, मा सरपंच बाळासाहेब देवाडे, अध्यक्ष श्री सिताराम देवाडे, आदर्श ग्रामसेवक मारुती देवाडे, मा सरपंच नारायण देवाडे व मुंबईकर मंडळ व ग्रामस्थ मंडळी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते या पवित्र निमित्ताने पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी उत्सवात सहभागी होऊन कीर्तन श्रवण व महाप्रसादाचा लाभ घेतला. या यशस्वी आयोजनाबद्दल समस्त ग्रामस्थ श्री क्षेत्र देवतोराणे बु. यांच्या वतीने सर्व उपस्थित भाविकांचे आभार मानण्यात आले. यावेळी सुत्रसंचालन सरपंच हभप प्रभू महाराज देवाडे यांनी केले वार्ताहर : हितेश पानमंद, देवतोराणे – खेडदेव तोरणे येथे श्री कालभैरवनाथ जन्माष्टमी उत्सव भक्तीमय वातावरणात साजरा
दैनिक युवक आधार प्रतिनिधी डॉ. देवेंद्र ओव्हाळ खेड पुणे श्री क्षेत्र देवतोराणे (ता. खेड, जि. पुणे) – श्री क्षेत्र देवतोराणे (बु.) येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही श्री कालभैरवनाथ जन्माष्टमी उत्सव मोठ्या उत्साहात व भक्तीभावाने साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम बुधवार, दि. १२ नोव्हेंबर २०२५ रोजी पार पडला असून पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. सकाळी अभिषेक, स्नान व महाआरतीने उत्सवाची सुरुवात झाली. दुपारी हरिपाठ व होमहवन कार्यक्रम पार पडले, तसेच संध्याकाळी कीर्तनसेवा आणि रात्री पालखी सोहळा मोठ्या जल्लोषात पार पडला. या प्रसंगी कीर्तनसेवा भागवताचार्य रामायणाचार्य ह.भ.प. संतोष महाराज ताजणे (देवाची आळंदी) यांच्या द्वारे संपन्न झाली. कार्यक्रमाचे सौजन्य स्मरणार्थ कै. ताराई नामदेव देवाडे व श्री. बाळासाहेब नामदेव देवाडे (मा. उपसरपंच) यांचे योगदान राहिले. उत्सवाच्या आयोजनासाठी समस्त गुरव समाज देवतोरणे, कै. बबन लक्ष्मण गोसावी ( समस्त गोसावी परिवार खरपुडी) कै विष्णू महादु शिंदे यांच्या स्मरणार्थ मा सरपंच संभाजी शिंदे यांच्या व श्री. बाळासाहेब गोपाळे यांचे विशेष सहकार्य लाभले. यावेळी मंदिर परिसरात आकर्षक लाईट डेकोरेशन व साऊंड सिस्टीमची सुंदर व्यवस्था करण्यात आली होती. या उत्सवात निमित्ताने प्रमुख उपस्थिती खेड तालुक्याचे लोकप्रिय आमदार मा.श्री बाबाजीशेठ रामचंद्र काळे समवेत उप तालुकाप्रमुख सुभाष शेठ मांडेकर, शहर प्रमुख संतोष (पप्पू) राक्षे, विभाग प्रमुख अमोल दादा पाचपुते, सरपंच नितीन रायकर, राहुल मलगे, चंद्रकांतशेठ सातपुते, ग्रा.सदस्य महेशभाऊ शेटे पं.समिती इच्छुक उमेदवार सौ. सारिकाताई अर्जुन गोगावले
युवा नेते मा.जिल्हा परिषद सदस्य मा.श्री अतुल भाऊ देशमुख समवेत खजिनदार श्री गणेश दादा चोरघे, पं.समीती इच्छुक उमेदवार सौ.जयाताई रणजित भोकसे
जिल्हा परिषद इच्छुक उमेदवार सौ.सुनीताताई शरदभाऊ बुट्टेपाटिल, श्री जयसिंग शेठ दरेकर, पं.समिती इच्छुक उमेदवार सौ.पल्लवीताई जयसिंग दरेकर समवेत अनेक गावचे सरपंच,उपसरपंच, चेअरमन, युवा नेते आणि किर्तनकार गायनाचार्य मृदंगाचार्य श्रोते मंडळी समवेत खेड तालुक्यातील वारकरी संप्रदाय उपस्थित होता यावेळी
यावेळी श्री क्षेत्र देवतोरणे गावच्या सरपंच सौ.विजयाताई प्रभू देवाडे उपसरपंच सौ.सुनिताताई गोविंद कलवडे मा.सरपंच गौतम आवारी, मा सरपंच श्री संभाजी शिंदे, मा सरपंच बाळासाहेब देवाडे, अध्यक्ष श्री सिताराम देवाडे, आदर्श ग्रामसेवक मारुती देवाडे, मा सरपंच नारायण देवाडे व मुंबईकर मंडळ व ग्रामस्थ मंडळी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते या पवित्र निमित्ताने पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी उत्सवात सहभागी होऊन कीर्तन श्रवण व महाप्रसादाचा लाभ घेतला. या यशस्वी आयोजनाबद्दल समस्त ग्रामस्थ श्री क्षेत्र देवतोराणे बु. यांच्या वतीने सर्व उपस्थित भाविकांचे आभार मानण्यात आले. यावेळी सुत्रसंचालन सरपंच हभप प्रभू महाराज देवाडे यांनी केले

# पेण नगरपरिषद निवडणूक सलग चौथ्या दिवशी एक उमेदवाराचा अर्ज दाखल

## सर्वपक्षीय उमेदवार संभ्रमात, नव्या सुशिक्षित लोकप्रतिंधींची पालिकेत एन्ट्री होण्याची शक्यता

**दैनिक युवक आधार**
**पेण ( दीपक लोके )**
राज्यातील नगर परिषदांच्या निवडणुका जाहीर झाल्यानंतर आघाडी आणि युतीसह सर्वच पक्षाची उमेदवारांची चाचपणी सुरू झाली असून रायगड जिल्ह्यातील पेण नगरपरिषदेच्या निवडणुकीतील अर्ज दाखल करण्याच्या सलग चौथ्या दिवशी देखील कोणत्याही पक्षाचा कोणताही अर्ज दाखल झाला नव्हता फक्त अपक्ष उमेदवाराचा एकअर्ज दाखल झाला होता. यातून उमेदवार अर्ज दाखल करण्याच्या बाबतीत संभ्रमात असल्याची चर्चा पेण शहरातील मतदारांमध्ये पहायला मिळत आहे.



पेण नगरपरिषदेच्या निवडणुकीत 12 प्रभागांमध्ये 24 उमेदवार रिंगणात असणार असून 1 उमेदवार नगराध्यक्षपदाचा असे एकूण 25 उमेदवार मतदारांना निवडून द्यायचे आहेत. यासाठी आघाडी, युती यांसह इतर पक्ष आणि स्थानिक आघाड्यांची उमेदवारांची चाचपणी सुरू आहे. मात्र पेण पालिका निवडणुकीचा विचार करता मागील काही दिवसांपासून आघाडीतील पक्ष आणि युतीतील पक्षांची जागा वाटप आणि उमेदवारांची निश्चिती यात ताळमेळ बसत नसल्याने शहरात आघाडी आणि युती होईल की नाही यात शंका व्यक्त केली जात आहे. त्यामुळे अर्ज दाखल करण्याचे तीन दिवस उलटून देखील यातील कोणत्याही उमेदवाराचा अर्ज दाखल झाला नाही. याव्यतिरिक्त मनसेने यापूर्वीच आपले सर्व उमेदवार स्वबळावर लढण्याची घोषणा जरी केली असली तरी त्यांनी देखील आपले उमेदवार अजून जाहीर केले नसल्याने त्यांचा देखील कोणताही उमेदवार अर्ज दाखल करू शकला नाही. पेण शहरात माजी नगराध्यक्ष शिशिर धारकर यांनी आपली आम्ही पेणकर विकास आघाडी घोषित केली असून त्यांनी त्यांचे काही उमेदवार घोषित देखील केले आहेत, मात्र उमेदवार जरी घोषित झाले असले तरी त्यांच्या आघाडीतील देखील कोणत्याही उमेदवाराने आजपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल केला नाही. पेण शहरात आघाडी बाबत तसेच युती बाबत जागावाटपाच्या गेली अनेक दिवस नेतेमंडळींच्या चर्चा सुरू आहेत, मात्र कोणाला किती जागा सोडायच्या आणि जागा सोडल्या तरी कोणत्या सोडायच्या याबाबत गणित बसत नसल्याने पेच निर्माण झाला आहे. या सर्वपक्षीय नेत्यांमध्ये हा पेच जरी निर्माण झाला असला तरी इतर कोणत्याही अपक्ष उमेदवाराचा देखील अर्ज दाखल झाला नसल्याने पालिका निवडणुकीत पहिल्यांदाच सलग तीन दिवस कोणत्याही उमेदवाराचा अर्ज दाखल न झाल्याने निवडून येणाऱ्या लोकप्रतिनिधींमधेच संभ्रम असेल तर ते पेण शहरातील नागरी समस्या तरी सोडवतील का, की त्यातही त्यांना संभ्रम निर्माण होईल असे मतदारांकडून बोलले जात आहे. *ठळक* मतदार सुशिक्षित आणि नव्या चेहऱ्यांच्या शोधात पेण शहरात अनेक इच्छुक उमेदवार असे आहेत की त्यांनी बऱ्याच वेळा या शहरात नगरसेवक म्हणून प्रतिनिधित्व केले आहे. मात्र आज बरीच वर्षे झाली तरी पेण शहराचा विकास हवा तसा झाला नाही. पेण शहर हे रायगड जिल्ह्यातील मध्यवर्ती ठिकाण असल्याने या ठिकाणी पुढील एक ते दीड वर्षात मोठ्या प्रमाणात व्यापारीकरण होणार असल्याने पेणचा त्याप्रमाणे विकास होण्यासाठी आता सुशिक्षित आणि नवे चेहरे मतदार शोधत आहेत. हे नवे चेहरे कोण असतील हे उमेदवारी अर्ज दाखल करणे आणि त्यानंतर अर्ज मागे घेण्याच्या अंतिम तारखेलाच स्पष्ट होणार आहे. *ठळक* नाराज उमेदवारांची नवी फळी पालिकेत एन्ट्री करण्याची शक्यता
पेण पालिका निवडणुकीत यंदा सर्वच पक्षांकडून अनेक नवनवे उमेदवार इच्छुक आहेत.मात्र जुन्या लोकप्रतिनिधींना डावलून नव्या चेहऱ्यांना संधी द्यायची तर जुने लोकप्रतिनिधी नाराज होतील आणि नव्या तरुण सुशिक्षित उमेदवारांना संधी दिली नाही तर ते नाराज होऊन बंडखोरीला वाव मिळेल त्यामुळे अनेक राजकीय पक्षांनी आपले कोणतेही उमेदवार जाहीर न केल्याने आजच्या सलग तिसऱ्या दिवशी देखील एकाही उमेदवाराचा अर्ज दाखल झाला नाही. मात्र हेच नाराज इच्छुक उमेदवार इतर पक्षांचाकिंवा आघाडीचा आधार घेऊन पेण पालिकेत एन्ट्री करण्याची शक्यता नाकारली जात नाही.

## "राष्ट्रवादी शरदचंद्रजी पवार पक्षाकडून निवडणूक समितीमध्ये ओबीसी सेलच्या अरुण तोडकर यांच्या निवडीने ओबीसी सेलमध्ये उत्साह"

**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी ( रघुनाथ देवकर):** –स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्षाकडून जय्यत तयारी केली जात असून या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरच पक्षाकडून जिल्हा निवडणूक समिती जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्यासह अनेक दिग्गज नेत्यांचा समावेश असून गावपातळीपासून जिल्हा पातळीपर्यंत माजी उपमुख्यमंत्री आदरणीय विजयसिंह मोहिते पाटील व खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राजकीय धडे घेऊन विविध सेलच्या माध्यमातून आणि मोहिते पाटील गटाच्या समवेत विविध पातळीवर काम करीत जिल्हा परिषदेच्या सभागृहामध्ये ग्रामीण भागातल्या समस्या पोट तिडकीने मांडून जिल्हा परिषदेच्या अनेक योजना झोपडीपर्यंत पोहोचवून मोहिते पाटील परिवाराचा खंदया समर्थक कार्यकर्त्याची भूमिका कशा पद्धतीने करतो हे ज्यांनी दाखवून दिलं त्या राष्ट्रवादी शरदचंद्रजी पवार पक्षाच्या सोलापूर जिल्हा ओबीसी सेलचे अध्यक्ष अरुण तोडकर यांचाही समावेश झालेला आहे. ही बातमी समजताच ओबीसी सेल मध्ये मोठ्या प्रमाणात उत्साह वाढला असून या निवडीनंतर श्री अरुण तोडकर यांनी सांगितले की आदरणीय विजयसिंह मोहिते पाटील व सन्माननीय धैर्यशील भैया मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निश्चितपणाने पक्षाची बाजू वाड्यावस्त्यापर्यंत पोहोचवून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून आपले जे उमेदवार आहेत त्यांना निवडून आणण्यासाठी जीवाचे रान करणे हे माझे कर्तव्य आहे आणि या निवडणुकीमध्ये आमचा ओबीसी सेल निश्चितपणाने जिल्ह्यातील गावा गावांमध्ये आपल्या पक्षाची ध्येय धोरणे राबवून विजयाची मशाल तेवत ठेवल्याशिवाय राहणार नाही अशी प्रतिक्रिया आमच्या प्रतिनिधीकडे त्यांनी दिली.

# पुण्यातील जमीन व्यवहार प्रकरणी ४२ कोटी स्टॅम्पड्युटी नोटीस योग्यच !

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे स्पष्टीकरण

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी** : पुण्यातील मुंढवा कोरेगाव पार्क जमीन व्यवहार सरकारी मालमत्तेशी संबंधित असल्याने तो तांत्रिकदृष्ट्या रद्द करावा लागेल, मात्र हा व्यवहार रद्द करताना संबंधितांना एकूण ४२ कोटी रुपयांची स्टॅम्पड्युटी भरावीच लागेल, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले. मंत्री बावनकुळे म्हणाले, हा विषय मी तपासणार आहे. तपासणी केल्यावर लक्षात आले की,नोंदणी आणि मुद्रांक विभागाने हा व्यवहार तपासून योग्य ती कारवाई केली आहे. व्यवहाराची मूळ रक्कम ३०० कोटी रुपये दाखवण्यात आली होती. त्यावर २१ कोटींची स्टॅम्पड्युटी आकारण्यात आली. आता हा व्यवहार रद्द करण्यासाठी रीकन्वेअन्स करताना त्याचप्रमाणे अजून २१ कोटी रुपयांची स्टॅम्पड्युटी द्यावी लागेल. म्हणजेच एकूण ४२ कोटी रुपये भरावे लागतील, असे विभागाने स्पष्ट केल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. हा व्यवहार तांत्रिकदृष्ट्या चुकीचा झाला आहे. सरकारी जमीन परस्पर विकण्यात आल्यामुळे तो खोटा व्यवहार ठरतो. सरकारकडे जमीन परत घ्यावी लागेल. मात्र, ज्या रकमेवर व्यवहार दाखवला आहे त्यावर मुद्रांक शुल्क आकारणे मुद्रांक अधिनियमातील नियमांप्रमाणे बंधनकारक आहे. कारण केंद्राच्या मुद्रांक कायद्यानुसार व्यवहाराच्या मूल्यावर आधारित शुल्क आकारले जाते. "टायटलला यात अर्थ नाही; व्यवहार मुद्रांक अधिकाऱ्यांकडे जातो तेव्हा दाखवलेली रक्कम महत्त्वाची असते, असे नोंदणी व मुद्रांक महानिरीक्षकांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे विभागाने काढलेली नोटीस पूर्णतः नियमांनुसार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. "आमची समिती या संपूर्ण व्यवहाराचा अहवाल तयार करत आहे. समितीचा अहवाल आल्यानंतर अंतिम निर्णय घेतला जाईल. असेही ते म्हणाले.

# पैसे असेल तरच निवडणूक लढवावी का ...?

## सामाजिक कार्यकर्त्यांना मतदारांचा पाठिंबा का नाही... ?

**दैनिक युवक आधार**
**उदगीर प्रतिनिधी (बालाजी तेलंगे )**
स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडागुका जसजशा जवळ येत आहेत, तसतसा पैसा विरुद्ध कार्य हा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. गावपातळीवर वर्षानुवर्षे लोकांच्या सुखदुः खात सहभागी होणारे, संकटाच्या काळात धावून जाणारे, समाजासाठी झटणारे कार्यकर्ते निवडणुकीच्या वेळी मात्र मागे पडतात. तर देशांची ताकद, गटबाजी आणि दिखाव्याच्या बळावर उमेदवार मैदानात उतरतात आणि निवडून येतात. त्यामुळे मतदारांच्या मनात प्रश्न निर्माण झाला आहे. पैसे असेल तरच निवडणुक लढवावी का? अनेक ठिकाणी निवडणुकीचा स्वरूप खचौंक होत चालला आहे. प्रचारासाठी गाड्या, पोस्टर–बैनर, जेवणावळी, माणसे फिरवणे यासाठी लाखोंचा खर्च होत असल्याने ज्यांच्याकडे आर्थिक पाठबळ नाही अशा कार्यकर्त्यांना सुरुवातीपासूनच स्पर्धेत अडचणी येतात. हेच कार्यकर्ते वर्षानुवर्षे सामाजिक कामात गुंतलेले असतात, लोकांच्या अडी अडवणीत हजर असतात, पण मतदानाच्या

### मतदारांनी विचार करण्याची गरज !
### निवडणुकीत पैसा वाटणारे उमेदवार लोकांसाठी नव्हे तर स्वतःच्या फायद्यासाठी गुंतवणूक करतात !

वेळी मतदार तो चांगला माणूस आहे एवढेच सांगतात, मत मात्र पैशावर किंजा गटबाजीत आधारलेल्या उमेदवारांनाच देतात. त्यामुळे खरे सामाजिक कार्यकर्ते निवडणुकीत कोलमडतात आणि पैशाच्या जोरावर निवडणूक लढवणा–यांचा विजय होतो. लोकशाहीत मतदार राजा असतो, पण जर मतदारांनी सजगपणे विचार न करता पैशावर, लाभावर आधारित मतदान केले, तर विकासाच्या प्रश्नांवर त्याचे दूरगामी परिणाम होतात. निवडणुकीत पैसा वाटणारे उमेदवार लोकांसाठी नव्हे तर स्वतःच्या फायद्यासाठी गुंतवणूक करतात आणि नंतर ती वसूल करतात, ही कटू वस्तुस्थिती आहे. समाजासाठी सातत्याने काम करणाऱ्यांना खरा पाठिंबा मिळावा यासाठी मतदारांनी आपली मानसिकता बदलण्याची आणि विकासाला प्राधान्य देणारे मतदान करण्याची गरज आहे. निष्ठावंताने पक्षासाठी आयुष्यभर सतरंज्या उचलाव्यात, पाग तिकीट मागूय नये का ? अनेक कार्यकर्ते आपल्या गावात, मतदारसंघात लोकांमध्ये काम करून नाव निर्माण करतात परंतु तिकीट वाटपाच्या वेळी गटबाजी, आर्थिक ताकद, वरच्या स्तरावरील शिफारसी, राजकीय सौदे यांना प्राधान्य दिले जाते. बंद होतात. परिणामी, जमिनीवर खऱ्या अर्थानामाही पाय मारे कार्यकर्ते उपेक्षित राहतात त्यांना आपला आहेस या एका वाक्यात केलेले कार्यकों वर्षानुवर्षे नेतृत्वाची मानमरातात पोस्टर लावतात, बैनर काहतात जनतेत प्रभार करतात, एम निर्णायक क्षणी त्यांध्यासाठी दरवाजे बंद होतात

# नवतरूण पिढीचा का वैचारीका चा नगसेवक ?

## उदगीर नगर परिषद वार्ड. क्र.20 मध्ये ओपन पुरुष प्रवर्ग मध्ये मोठी लढत

### स्थानिक उमेदावार आम्ही निवडु देणार वैचारिक मतदार यांची र्चचा...!

**दैनिक युवक आधार**
**उदगीर प्रतिनिधी ( बालाजी तेलंगे )**
उदगीर नगर परिषद निवडनुक लागली असुन उदगीर नगर परिषद वार्ड क्रं 20 ही खुप वेगळी निवडनुक आसते या वार्ड मध्ये ओपन पुरुष असो की ओपन महीला असो गेल्या आनेक वर्षे पासुन एकच नामांकित नगर सेवक मा.राजेद्र भाऊ भोसले हे आसतात त्यांनी गेल्या 20 ते 25 वर्षे पासुन जनतेस योग्य सेवा दिली असुन यांच्या केलेल्या आजपर्यत च्या कामानास नागरितील वैचारीक मतदार आहेत. या वेळेस सुधा आम्हाला आमच्या स्थानीक ठिकाणचा उमदेवार निवडुन देणार आशी र्चचा मतदार यांच्यात चालु आसुन . आम्ही आमची संयम अखेर सोडनार नाही वार्ड .क्र. 20 मध्ये भारतीय जनता पार्टी यांनी आनेक वेळा गेल्या 20 ते 25 वर्षे पासुन माजी नगरसेवक राजेद्र भोसले यांच्या विरोधात आनेक मोठे उमेदवार उभे करता पण आज परेत ओपन पुरुष प्रवर्गात भारतीय जनता पार्टी यांना यश मिळाले नसुन .परत आता 2025 मधील स्थानीक निवडनुक मध्ये आता ओपन पुरुष प्रवर्गत बाळासाहेब पाटोदे हे असुन यांच्या पाठीशी नवतरून पिढी आहे पण या वार्डामध्ये वैचारीक लोकाची संख्या मोठी आहे .
त्यामुळे या वार्डत योग्य व्यक्ती निवडुन येतो
पण आता या वार्डमध्ये नविन पिढी मतदार यांच्या मनात बाळासाहेब पाटोदे तर वैचारिक मतदार यांच्या मनात राजेद्रभाऊ भोसले आहेत या मध्ये शेवट विजय नव तरुण पिढीचा का वैचारीका चा या कडे जनतेचे लक्ष काही. उमेदवारामुळे नव तरुण पिढी खराब होत असल्याची चर्चा सुधा सर्व वार्डत चालु आहे त्या मुळे चांगला च उमेदावार निवडुन देऊ अशी चर्चा मतदार यांच्या चालु आहे .

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# शिवसेनेला मोठा धक्का ; राष्ट्रवादी पक्षाचे निवडणूकित पारडे जड

**दैनिक युवक आधार**
खोपोली वार्ताहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कर्जत-खालापूर आढावा बैठक आणि भव्य पक्षप्रवेश सोहळा आज (दि.१३) रॉयल गार्डन, कर्जत येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष तथा खासदार सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या दृष्टिकोनातून ही बैठक फार महत्त्वाची असून यामध्ये कर्जत खालापूर माथेरान खोपोली नगरपालिका तसेच जिल्हा परिषद पंचायत समिती बाबतीत अनेक चर्चा करण्यात आल्या व तेथील पदाधिकारी कार्यकर्त्यांचा आढावा घेत मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या. त्यावेळी अनेकांचे पक्षप्रवेश करून पक्ष पदाच्या जबाबदारी देण्यात आल्या .यावेळी पुष्पा हरिश्चंद्र दगडे यांना कर्जत नगरपरिषद उमेदवार पदाची घोषणा केली तर अन्य घोषणा लवकरात लवकर केल्या जातील असे सांगण्यात आले.शेकडोंच्या संख्येने कार्यकर्ते घेऊन आलेल्या आई ग्रुपचे दिनेश जाधव यांचा पक्ष प्रवेश यावेळी अनेकांच्या भुया उंचावणारा ठरला .




पुढील आमदार सुधाकर घारे होईपर्यंत शांत बसणार नाही , पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी अहोरात्र संघर्ष करू आणि येणारी निवडणूक जिंकू असे दिनेश थोरवे यांनी आपल्या प्रभावी भाषणात सांगत आपली शिवसेनेबद्दलची नाराजी हि व्यक्त केली. यावेळी माजी नगराध्यक्ष डॉ. सुनील पाटील यांनी व माजी नगराध्यक्ष दत्तात्रेय मसुरकर व पंकज पाटील मनिष यादव यांनी येत्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बळकटीसाठी काम करून पालिकेत जास्तीत जास्त निवडणूकीत उमेदवार जिंकून आणण्यासाठी प्रयत्न करू व राष्ट्रवादीचा झेंडा परत नगरपरिषदेवर फडकू असा विश्वास व्यक्त केला. हा पक्षप्रवेश सोहळा अपप्रवृत्तीच्या लोकांना धडा शिकण्यासाठी त्यांना त्यांची जागा दाखविण्यासाठी असल्याचे सांगत येत्या काळात आपल्या सर्वांच्या सहाय्याने राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष संपूर्ण जिल्ह्यात व राज्यात 1 नंबर व ठेवून जनतेच्या सेवेसाठी कटिबद्ध राहू असे खासदार सुनील तटकरे यांनी आपल्या भाषणात सांगितले. जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे यांनी मागील निवडणुकीचा अनुभव पाहता आज झालेल्या पक्षप्रवेश् सोहळ्याच्या निमित्ताने पक्षात सर्वांचा मानसन्मान राखला जाईल व संकटानात्मक निर्णयाने सर्वांना सोबत घेत येणाऱ्या निवडणुकीत राष्ट्रवादीचा झेंडा फडकवल्याशिवाय राहणार नाही असे सांगत विरोधकांना त्यांची जागा दाखवूया असे सांगत त्यांचा खुरपुस समाचार घेतला. रायगड जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती पुंडलिक पाटील, शिवसेना शिंदे गटाचे कर्जत खालापूर विधानसभा संघटक पंकज पाटील, माजी नगरसेविका सौ. पुष्पा हरिश्चंद्र दगडे, महाराष्ट्र नवनिर्माण सेने रायगड जिल्हा सचिव जे. पी. पाटील, युवा नेते दिनेश जाधव, माजी नगरसेवक खोपोली चंद्रप्पा अनिवार, सामाजिक कार्यकर्ते योगेश मारुती गायकवाड, कर्जत तालुका धनगर समाज अध्यक्ष तुकाराम बाबू आखाडे , धनगर समाजाचे जेष्ठ कार्यकर्ते बाबू धोंडू ढेबे व रामचंद्र नारायण ढेबे, अभिजीत विजय राणे, राजेंद्र साखरे, माजी नगरसेवक खोपोली मधुकर दळवी ,माजी नगरसेविका खोपोली मेघा वाडकर, माजी नगरसेविका खोपोली चंद्रभागा चंद्रप्पा अनिवार, शिवसेना शिंदे गट बीड जिल्हा परिषद विभाग संघटक मनोज वसंत बोडके, माथेरान शहर महिला काँग्रेस अध्यक्ष स्नेहा संतोष चव्हाण, खरीवली पंचायत समिती शिवसेना सहसंघटक सतीश बाबाजी मोरे, युवासेना शाखाप्रमुख झाडाणी शंकर रखमाजी मोरे यांच्यासह त्यांच्या असंख्य कार्यकर्त्यांनी जाहीर पक्ष प्रवेश केला. याप्रसंगी व्यासपीठावर प्रदेशाध्यक्ष ,खा.सुनील तटकरे, जिल्हाध्यक्ष सुधाकर घारे, जेष्ठ नेते दत्तात्रय मसुरकर, प्रदेश उपाध्यक्ष सुनील पाटील, प्रदेश सरचिटणीस अशोक भोपतराव, रायगड जिल्हा प्रमुख प्रवक्ते भरत भाई भगत, सरचिटणीस एकनाथ धुळे, कर्जत शहर अध्यक्ष भगवान शेठ भोईर, कर्जत तालुका अध्यक्ष दिपक श्रीखंडे, खालापूर तालुका अध्यक्ष संतोष बैलमारे, जिल्हा युवक अध्यक्ष अंकित साखरे, कर्जत खालापूर विधानसभा अध्यक्षा अश्विनीताई पाटील यांसह पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सोळा लाखांची घरफोडी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

घराचा दरवाजाची कडी कोयंडा तोडून दागिने आणि रोख रक्कम असा 16 लाखांचा ऐवज चोरून नेल्याप्रकरणी चोरा विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात 11 नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

चैतन्य काळे हे महात्मा फुले रोड पनवेल येथे राहत असून त्यांच्या घराच्या दरवाजाची कडी तोडून चोराने कपाटातील रोख रक्कम आणि दागिने असा एकूण सोळा लाखांचा ऐवज चोरून नेला.

## गावठी हातभट्टीची दारू प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

गावठी भट्टीच्या दारू प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात बारक्या बबन कातकरी आणि राजू वास्कर यांच्या विरोधात 11 नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

11 नोव्हेंबर रोजी मानघर जंगलामध्ये गावठी हातभट्टीची दारू तयार होत असल्याची माहिती पनवेल शहर पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलीस माणघर जंगलात गेले असता धूर दिसून आला. त्या ठिकाणी पाहणी केली असता दोन ईसम गावठी हातभट्टीची दारू काढत असताना दिसून आले. त्यातील एक जण पळून गेला आणि दुसऱ्याला ताब्यात घेतले. त्यांनी त्याचे नाव बारक्या बबन कातकरी असे सांगितले. पळून गेलेल्या इसमाचे नाव राजू वास्कर (राहणार कुंडे वहाळ) असे सांगितले.

## अज्ञात वाहनाची स्कुटीला धडक, महिलेचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

अज्ञात वाहनाने स्कुटीला दिलेल्या धडकेत महिलेचा मृत्यू झाल्याची घटना राहुल पार्क हॉटेल, पळस्पे येथे घडली. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात 11 नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. प्रियांशू त्रिपाठी हे शिखर ग्रीन सोसायटी, रसायनी पनवेल येथे राहत असून दहा नोव्हेंबर रोजी ते त्यांची आई रंजीता त्रिपाठी (वय 42) हे रात्री साडेआठच्या सुमारास उलवे येथून एक्टिवा स्कुटी क्रमांक एम एच 43 बीआर 1847 ने राहत्या घरी शिखर ग्रीन सोसायटी, रसायनी येथे जाण्यासाठी निघाले. ते राहुल पार्क हॉटेल, पळस्पे येथे आले असता पाठीमागून आलेल्या अज्ञात वाहनाने त्यांच्या स्कुटीला धडक दिली. त्यामुळे त्यांचा गाडीवरचा ताबा सुटला आणि त्यांची आई रस्त्यावर खाली पडली. तिच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यांना गांधी हॉस्पिटल, पनवेल येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस अधिक तपास करत आहेत.

## पाच लाख 14 हजार 400 रुपयांची फसवणूक

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

स्टील साठी दिलेले पाच लाख 14 हजार 400 रुपये परत न करता फसवणूक केल्या प्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात अकरा नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. पनवेल येथील संतोष शंकर अस्वले यांचा बिल्डिंग मटेरियल सप्लायरचा व्यवसाय आहे. त्यांना 9 टन टाटा स्टीलची ऑर्डर मिळाली. डीलर कडे टाटा स्टील उपलब्ध नसल्याने त्यांनी गुगलवर व्यक्ती आणि एजन्सी सर्च केली असता मोबाईल नंबर मिळाला. संपर्क केला असता यावेळी समोरील इसमाने पाच लाख 14 हजार 400 रुपयांचे बिल पाठवले. आणि त्यानंतर संतोष यांनी आरटीजीएस द्वारे पेमेंट केले. दुसऱ्या दिवशी समोरील इसमाने लहान ऑर्डर साठी डिलिव्हरी होऊ शकत नाही, 15 ते 18 टन ऑर्डर केल्यास डिलिव्हरी केली जाईल अन्यथा ऑर्डर ब्लॉक करून पैसे परत केले जातील असे सांगितले. त्यावेळेस संतोष यांनी पैसे परत करण्यास सांगितले. त्यावेळी 24 तासात पैसे येतील असे सांगितले. त्यानंतर संतोष यांनी बँकेत जाऊन चौकशी केली असता समोरील इसमाचे नाव विनोद कुमार व मेरठ येथील बँक असल्याचे समजले. त्यांनी आरटीजीएस केलेले पाच लाख 14 हजार 400 रुपये परत आले नाहीत. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर गुन्हा दाखल करण्यात आला.

## मीनल जोगळेकर यांना पितृशोक

दैनिक युवक आधार
मुंबई / प्रतिनिधी जनसंपर्क महासंचालनालयाच्या उपसंचालक तथा हल्ली कार्यरत मुंबई येथील पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, सांस्कृतिक कार्य विभागाच्या संचालक मीनल शशिकांत जोगळेकर यांचे वडील *अरुण केशवराव मोने (* वय ८४ ) यांचे त्यांच्या राहते घरी दीनदयाल नगर,नागपूर येथे दिनांक १३ नोव्हेंबरला सकाळी ८.३० वाजता दीर्घ आजाराने निधन झाले. ते रिझर्व बँक ऑफ इंडियाचे

## शिवसेना ( उबाठा ) पक्षाचे खांदा वसाहत शहरप्रमुख सदानंद शिर्के यंदाची महानगरपालिका निवडणूक लढणार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)** गेल्या अनेक वर्षापासून खांदा वसाहत व परिसरात राजकीय तसेच सामाजिक क्षेत्रात भरीव कार्य करणारे शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाचे खांदा वसाहत शहरप्रमुख सदानंद शिर्के यंदाची महानगरपालिका निवडणूक लढण्यासाठी सज्ज झाले आहेत . त्यांनी गेली अनेक वर्ष सामाजिक कार्य करताना असंख्य गरजूंना दरवर्षी वह्या वाटप केले . त्याचप्रमाणे महानगरपालिकेने लादलेल्या वाढीव टॅक्स संदर्भात आंदोलन पाणि संदर्भात वेळोवेळी आंदोलने केली आहेत . महानगरपालिकेच्या अकार्यक्षमतेमुळे या भागातील रस्त्यांना पडणारे खड्डे , वाहते गटार , पाण्याचा प्रश्न आदी नागरी प्रश्नावर पनवेल महानगरपालिका व सिडको विरोधात जनआंदोलन करून न्याय मिळून दिला आहे . तसेच कॉलेज, शाळा, पोलीस स्टेशन ,महानगरपालिका अन्य सर्व कामांसाठी अग्रेसर होऊन त्यांनी काम केले आहे . ते शिवसेना पक्षाचे एकनिष्ठ गेली 35 वर्ष कार्यरत आहेत . त्याचप्रमाणे सकल मराठा समाज खांदा कॉलनी सचिव, विशाल को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी अध्यक्ष, अशोक को-ऑपरेटिव हाऊसिंग सोसायटी उपाध्यक्ष, नवजीवन मित्र मंडळ अध्यक्ष, कोकण विकास सामाजिक संस्थापक अध्यक्ष म्हणून कामकाज पहात आहेत . त्यांनी महानगरपालिकैची २०१७ साली निवडणूक लढवली आहे पण त्यांचा त्यात निसटता पराभव झाला होता . परंतु यंदा कोणत्याही परिस्थितीत त्यांना विजयी करण्याचा चंग महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी बांधला आहे .




## फक्त 5 तासांत गुन्हा उघड!

### निफाड पोलिसांची धडाकेबाज कामगिरी, सोनसाखळी हिसकावणारा आरोपी जेरबंद

**दैनिक युवक आधार**
नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी निफाड : निफाड पोलिसांनी केवळ पाच तासांच्या आत महिला सोनसाखळी चोरी प्रकरणाचा छडा लावत आरोपीला जेरबंद करण्यात यश मिळवले आहे. नांदुर्डी शिवार येथे पाणी भरत असताना महिलेकडून सोन्याची साखळी हिसकावून पळालेल्या आरोपीला निफाड पोलिसांच्या तात्काळ तपास आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पकडण्यात आले.

घटना दि.११ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी सुमारास ५ वाजता घडली. नांदुर्डी येथील फिर्यादी महिला आपल्या घरामागील नळावर पाणी भरत असताना, अज्ञात व्यक्तीने पाणी मागण्याचा बनाव करून तिच्या गळ्यातील सोन्याची साखळी हिसकावली व दुचाकीवर बसून पसार झाला. या प्रकरणी निफाड पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३६८/२०२५ भा.दं.वि. कलम ३९२ नुसार जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

घटनेची माहिती मिळताच नाशिक ग्रामीणचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अपर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी के. के. पाटील यांनी तातडीने तपास गतीमान करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विजय गायकवाड, विश्वनाथ निकम आणि अन्य तपास पथकांनी घटनास्थळ तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले.

तपासादरम्यान मिळालेल्या संशयास्पद व्यक्तीच्या फुटेजच्या आधारे रेकॉर्डवरील आरोपींशी तुलना करण्यात आली. गुप्त माहितीच्या आधारे नांदुर्डी रोड परिसरातील सचिन सुदाम ढेपले (रा. निफाड शिवार, ता. निफाड, जि. नाशिक) यास ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. आरोपीकडून चोरीस गेलेला सोन्याचा दागिना, गुन्ह्यात वापरलेली दुचाकी व कपडे जप्त करण्यात आले.

ही कारवाई केवळ ५ तासांच्या आत यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आली.

या यशस्वी कामगिरीत पोलीस निरीक्षक गणेश गुरव, पो.उ.नि. विजय गायकवाड, विश्वनाथ निकम, पो.हवा. अनिल शेरेकर, भास्कर पवार, पो.ना. नितीन सांगळे, पो.शि. विनोद जाधव, राजू दरोडे, धनंजय जाधव, सिद्धार्थ वाघ, मपोना. ललिता कोकणे व मपोहवा. पुनम शिंदे यांनी मोलाची भूमिका बजावली. पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी निफाड पोलिसांच्या तात्काळ प्रतिसादाचे व उत्कृष्ट




## कामोठे वसाहतीमधील तरुणास भामट्या साधूने फसविले

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)** श्रद्धेचा गैरफायदा घेत साधूपणाचा मुखवटा धारण करणाऱ्या एका भामट्याने कामोठे येथे राहणाऱ्या तरुणाला हिप्नोटाईज करून त्याच्याजवळ असलेली सव्वा लाख रुपये किंमतीची सोन्या-हिऱ्याची अंगठी लंपास केल्याची घटना घडली आहे . एनआरआय सागरी पोलिसांनी साधूच्या वेशात आलेल्या भामट्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे.तक्रारदार उदय केंद्रे (३०, रा. पार्क हेवन सोसायटी, से. २१, कामोठे) हा सकाळी सीवूड्स, सेक्टर-४० मधील पोतदार शाळेजवळ कामानिमित्त आले होते. यावेळी उदय त्याच्या कारमधून उतरत असताना एक जटाधारी, काळे कपडे परिधान केलेली व द्राक्षाच्या माळा व भगवी थैली हातात असलेला अनोळखी व्यक्ती त्याच्याजवळ आली. त्यावर भिक्षा मागणाऱ्या या साधूला उदय यांनी १०० रुपयांची नोट दिली. यानंतर या भामट्याने हातचलाखीने त्याच नोटेसह रुद्राक्ष व फूल देत उदय याचा विश्वास संपादन केला. त्यानंतर त्याने उदय यांच्याकडून त्यांच्या हातातील प्लॅटिनमची अंगठी मागून घेतली व ती परत दिली. व त्याला बोलण्यात गुंतवून ही अंगठी काढून घेतली व तेथून पलायन केले. त्यानंतर ही माहिती त्याने त्याच्या मित्रांना दिल्यानंतर त्यांनी एनआरआय सागरी पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार दाखल केली.

## आखाडा राजकारणाचा या सदरासाठी.

संपादकीय – आखाडा राजकारणाचा सध्या महाराष्ट्रात ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, महापालिका आणि महानगरपालिकेच्या निवडणुकीचे वारे जोर धरले आहेत. अशा काळात प्रत्येक मतदाराची जबाबदारी वाढते. मतदान हे फक्त अधिकार नाही, तर लोकशाहीत सक्रिय सहभागाचा मार्ग आहे. "आखाडा राजकारणाचा" हा सदर नेमका हा उद्देश साधेल – तुम्हाला रोजच्या राजकारणातील घडामोडी, स्थानिक निवडणूक माहिती, उमेदवारांचे कार्य आणि तुमच्या मताचा प्रभाव याची सोप्या भाषेत माहिती देणे. मतदार होणं फक्त मतदानापुरतं मर्यादित नाही. शिक्षित, जागरूक आणि विचारपूर्वक निर्णय घेणारा मतदारच आपल्या समाजासाठी खरा बदल घडवू शकतो. तुमचा एक एक वोट गावापासून महानगरपर्यंत राजकारणात फरक घडवतो. हा अखाडा तुम्हाला राजकारणाचे तथ्य, संघर्ष आणि निर्णय प्रक्रियेची खरी माहिती देईल. तसेच, मतदानाच्या प्रत्येक टप्प्यावर तुमची भूमिका महत्त्वाची असल्याचे लक्षात आणून देईल. मतदानाला महत्त्व द्या, जागरूक राहा आणि तुमचा आवाज लोकशाहीच्या अखाड्यात ठसा उमटवा! आसाराम विरकर, संपादक मराठवाडा आवृत्ती दैनिक युवक आधार

# संशयित दिव्यांगांची पुन्हा शारीरिक तपासणी करा

### बोगस दिव्यांग प्रमाणपत्र मिळवणाऱ्यांवर कठोर कारवाई करा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी महेश साळुंके लासलगाव**

लासलगाव परिसरात अनेक बोगस दिव्यांग अस्तित्वात असल्याची माहिती मिळत आहे.

दोन्ही डोळ्यांनी शंभर टक्के {बोगस )दिव्यांग असलेली व्यक्ती लासलगाव परिसरात घड्याळ रिपेअर करताना दिसून येत आहे; तर 60 टक्के अपंग (बोगस )असलेली व्यक्ती भरधाव बुलेट चालविताना दिसून येत आहे.

लासलगाव : शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा गैरफायदा घेणाऱ्या बोगस दिव्यांग प्रमाणपत्रधारकांच्या विरोधात कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी ओरिजनल दिव्यांगांकडून करण्यात आली आहे. या संदर्भात जिल्हा शल्य चिकित्सक नासिक यांना आणि दिव्यांग मंत्रालयाचे सचिव तुकाराम मुंढे यांना निवेदन देण्यात आले असून संशयित दिव्यांगांच्या केवळ कागदपत्र तपासणीवर न थांबता संशयास्पद व्यक्तींची पुन्हा प्रत्यक्ष शारीरिक तपासणी करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

निफाड तालुक्यातील दिव्यांग यादीत समाविष्ट सुमारे ३० टक्के धडधाकट व्यक्तींनी काही रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने आर्थिक देवाणघेवाण करून खोटे दिव्यांग प्रमाणपत्र मिळवले असल्याचा आरोप दिव्यांग संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे सरकारी नोकरीतील आरक्षण, विविध विभागांतील पदभरती, कार्यालयीन बदली, पेट्रोल पंप, गॅस एजन्सी, दिव्यांग अंत्योदय शिधापत्रिका धारण करून महिन्याला 35 किलो धान्याची लूट, खऱ्या गरजू दिव्यांगांसाठी असलेल्या दरमहा निवृत्तीवेतन योजनेचा लाभ,तसेच दिव्यांगांसाठीच्या इतर लाखो-कोट्यवधी रुपयांच्या योजना लाटल्या जात आहे. हे बोगस दिव्यांग मुळातच दिव्यांग नसल्यामुळे जलद शारीरिक हालचाली आणि धावपळ करून शासनाच्या लाभांचा अत्यंत तत्परतेने लाभ उकळत असल्याने खऱ्या दिव्यांगांवर मात्र लाचारीने त्यांच्याकडे फक्त बघत बसण्याची वेळ आलेली आहे, यामुळे खऱ्या दिव्यांगांवर अन्याय होत असल्याचे प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेने वेळोवेळी प्रशासकीय यंत्रणेच्या निदर्शनास आणून देऊन देखील आणि माजी दिव्यांग कल्याण मंत्री ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू यांनी देखील वेळोवेळी आवाज उठवून देखील याकडे गांभीर्याने लक्ष देण्यामध्ये शासनाकडून उदासीनता दाखवली जात आहे, ही मोठी खेदाची बाब आहे. बॉक्स # खोटे दिव्यांग ओळखण्यासाठी

यासंदर्भात दिव्यांग कल्याण मंत्रालयाकडून आणि आयुक्तालयाकडून सर्वच प्रमाणपत्रांची काटेकोर पडताळणी करण्यात येते. त्यात कागदपत्र तपासणी करून दोषींवर कारवाई करण्यात येईलच

मात्र, केवळ कागदपत्र तपासणीवरून खोटे दिव्यांग ओळखता येणार नाहीत, कारण ही कागदपत्रे बनावट नसून ओरिजनलच आहेत, कारण मुळातच वैद्यकीय तपासणी करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्यांशी आणि संबंधित यंत्रनेशी साटे- लोटे करून खोट्याचे खरे करून अत्यंत किरकोळ शारीरिक व्यंग असलेल्या आणि काटेकोर तपासणीमध्ये 40 टक्याच्या आत असलेल्या अशा बोगस दिव्यांगांनी अर्थपूर्ण बाबींचा आणि गैरप्रकारांचा अवलंब करून त्यांच्या अपंगत्वाची टक्केवारी 40% च्या पुढे करून घेतल्यामुळे ते बोगस दिव्यांग मोहिमेच्या तपासणी मधून अलगद निसटू शकतात,असा मुद्दा संघटनेचा आहे.

अनेक प्रकरणांत शारीरिक तपासणी न करताच प्रमाणपत्र व यूडीआयडी कार्ड देण्यात आल्याचा आरोप चंद्रकांत भावसार, मनोज परेराव, प्रवीण गाढे, शहानवाज शेख, किरण देसाई आदि खऱ्याखुऱ्या दिव्यांग बांधवांनी केला आहे.

कर्णबधिर, अल्पदृष्टी, अस्थिभंग (४० टक्के ते ६० टक्के) यांसारखे अदृश्य दिव्यांगत्व हे प्रत्यक्ष तपासणीतूनच निश्चित करता येते.

त्यामुळे महाराष्ट्र राज्य दिव्यांग नियम २०२४ मधील नियम क्रमांक ८ (२) नुसार संशयास्पद दिव्यांगांची पुन्हा तपासणी करावी. बॉक्स #
खऱ्या दिव्यांगांना न्याय द्या
दिव्यांग कल्याण विभागाने सर्व प्रमाणपत्रांची काटेकोर पडताळणी करावी व खोटे दिव्यांग उघडकीस आणून त्यांच्यावर कठोर कारवाई केल्याशिवाय खऱ्या दिव्यांगांना न्याय मिळणार नाही. अन्यथा आम्हाला संघर्षाचा मार्ग स्वीकारावा लागेल.

भूपेंद्र दगडे , संस्थापक सदस्य प्रहार दिव्यांग क्रांती संघटना.

धक्कादायक बाब म्हणजे केवळ नासिक जिल्ह्यातच नव्हे; तर संपूर्ण महाराष्ट्र राज्यामध्ये देखील असे खोट्याचे खरे करून अत्यंत किरकोळ शारीरिक व्यंग असलेल्या धुर्त लबाड महाभागांनी गैरमार्गाने 40% च्या पुढे अपंगत्वाचे प्रमाणपत्र धारण करून लाखो बोगस दिव्यांग शासनाच्या दिव्यांग कल्याणकारी योजनांना अक्षरशा लुटत आहेत आणि यामुळे खरा दिव्यांग हा अशा योजनांच्या भरीव लाभापासून वंचित राहत असल्याचे अत्यंत दुःखदायक आणि विदारक चित्र निर्माण झालेले आहे.

एका सर्वेक्षणानुसार प्रत्येक गावांमधील शेकडा 15 ते 20 टक्के असे खोट्याचे खरे करून दिव्यांगत्वाचे खरे प्रमाणपत्र धारण करणारे आढळून येतील; गरज आहे फक्त शासनाच्या आणि यंत्रणेच्या निष्पक्ष कठोर तपासणी मोहिमेची आणि त्यासाठी असलेल्या दुर्दम्य इच्छाशक्तीची.

# पत्रकारांसाठी 'एआय'चे प्रशिक्षण कौशल्यवर्धनाचा नाविन्यपूर्ण उपक्रम

## कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा

## 'एआय' मुळे पत्रकारिता अधिक तंत्रज्ञानयुक्त

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी** : जगभरात आता विविध क्षेत्रात 'एआय' तंत्रज्ञानाच्या माध्यमाने क्रांती घडत असून प्रसिद्धी माध्यमातही याचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. 'एआय' तंत्रज्ञान अत्याधुनिक पत्रकारितेला नवा पैलू देत असून यामुळे पत्रकारांचा अमूल्य वेळ ही वाचणार आहे. प्रत्येक क्षेत्रात अपस्किलींगला खूप महत्व आहे हे लक्षात घेवून राज्यात असा नाविन्यपूर्ण उपक्रम कौशल्य विकास विभागाने राबविला असल्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता न नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले.



रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ आणि मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मंत्रालय येथील पत्रकार कक्षात एआय संदर्भात प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यान आले. तिसऱ्या दिवशीच्या सत्रात 'एआय' तंज्ञानाच्या वापरासंदर्भात आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षण सत्राला कौशल्य मंत्री श्री. मंगलप्रभात लोढा यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ.अपुर्वा पालकर, एआय तज्ज्ञ किशोर जस्नानी,उपकुलसचिव राजेंद्र तलवारे, मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे, सरचिटणीस दिपक भातूसे तसेच प्रिंट,इलेक्ट्रॉनिक, डिजिटल माध्यमांचे पत्रकार यावेळी या प्रशिक्षणाला उपस्थित होते. मंत्रालय आणि विधिमंडळ संघाच्या सदस्य पत्रकारांनी या प्रशिक्षण कार्यशाळेला दिलेल्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे अत्याधिक आनंद झाला असल्याच्या भावना यावेळी कौशल्य विकास मंत्री लोढा यांनी व्यक्त केली. नवनवीन तंत्रज्ञान आल्यानंतर नेहमीच मनुष्यबळासंदर्भात चर्चा होते. मात्र या तंत्रज्ञानाने अधिकाधिक रोजगार उपलब्ध होतील, असेही त्यांनी नमूद केले. पत्रकारांना या कार्यशाळेचा दैनंदिन कामकाजात नक्कीच अधिक उपयोग करता येईल तसेच कामामध्ये अधिक तंत्रस्नेहीपणे काम करता येईल, असे कौशल्य मंत्री म्हणाले.

मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाचे सरचिटणीस दिपक भातुसे यांनी कौशल्य,रोजगार, उद्योजकता न नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून चार दिवसीय एआय प्रशिक्षण कार्यक्रम अत्यंत उत्कृष्ट असून या नाविन्यपूर्ण उपक्रमांचा पत्रकारांना नक्कीच उपयोग होणार असल्याचे सांगितले.

*'एआय' टूल्स उपयुक्त*

*कृत्रिम बुद्धिमत्ता तज्ज्ञ किशोर जस्नानी*

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) साधनांचा प्रभावी वापर करून बातमी लेखनाची गुणवत्ता अधिक वाढविता येते. यासाठी या टूल्सना योग्य सूचना देणे आवश्यक आहे. एआय साधने ही कामाची गती आणि गुणवत्ता वाढवण्यासाठी आहेत, असे मत एआय तज्ज्ञ किशोर जस्नानी यांनी मांडले.

रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ आणि मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मंत्रालय येथील पत्रकार कक्षात एआय संदर्भात प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले. तिसऱ्या दिवशीच्या सत्रात एआय तज्ज्ञ किशोर जस्नानी यांनी एआय ट्रल्सला योग्य सूचना देण्याबाबत मार्गदर्शन केले. त्याचबरोबर इंग्रजीचे मराठी भाषांतर, शीर्षक लेखन, संभाषण विश्लेषण आणि प्रॉम्प्ट लेखन याबाबत त्यांनी सविस्तर माहिती दिली.

किशोर जस्नानी यांनी सांगितले की, इंग्रजीचे मराठी भाषांतरासाठी "जेमिनी" हे टूल्स मराठी भाषेसाठी उत्तम असून ते अचूक व सहज भाषांतर देते.

बातमी लेखनात ५डब्लू आणि १एच (व्हू, व्हॉट, व्हेन, व्हेअर, व्हाय आणि हाऊ) यांचे भान ठेवून प्रॉम्प्ट तयार करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

शीर्षक लेखनाबाबत त्यांनी स्पष्ट केले की, एका बातमीसाठी विविध प्रकारची शीर्षके तयार करता येतात. यात छापील आवृत्तीचे शीर्षक, डिजिटल माध्यमासाठीचे शीर्षक, सर्च इंजिनसाठी अनुकूल शीर्षक, त्वरित लक्षवेधी शीर्षक या प्रकारांचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले."डीपसीक" हे टूल्स शीर्षक तयार करण्यासाठी प्रभावी असल्याचे त्यांनी नमूद केले.

आयडिओग्राम लिओनार्ड जेमिनी या एआय टूल्स मधून उत्तम चित्र निर्मिती करता येते. रेकार्ड संभाषणातून मुद्दे व तपशील टंकलिखित करण्यासाठी ऑटर एआय या साधनांचा वापर करण्यासंदर्भात प्रात्यक्षिक त्यांनी दिले. एखाद्या संभाषणात व्यत्यय असल्यास तो दूर करुन ते संभाषण योग्य पद्धतीने ट्रान्सक्राईब करण्याबाबतही त्यांनी प्राम्प्टसह मार्गदर्शन केले.

---

## मन्नास पिंपरी तपासणी शिबिर व आरोग्य विषयी मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**हिंगोली प्रतिनिधी प्रशांत टाकसाळ**

प्रशांत बहुउद्देशीय सेवाभावी संस्था वाशिम यांच्याद्वारे मन्नास पिंपरी या ठिकाणी पार पडले


सध्याच्या धकाधकीच्या काळामध्ये आपण आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतो त्यामुळे आपल्याला वेगळ्या आजारांना सामोरे जावे लागते आणि आपण आपल्या हाताने आपले आरोग्य जास्त आजार झाल्यानंतर खूप सारे मोठमोठे हॉस्पिटल ला जाऊन आपण कमावलेला पूर्ण पैसा खर्च करून पण आपल्याला चांगल्या आरोग्य लागत नाही या सगळ्यांचा विचार करून प्रशांत बहुउद्देशीय सेवाभावी संस्था वाशिम चे अध्यक्ष प्रशांत टाकसाळ यांनी आपल्या संस्थेच्या माध्यमातून गरजू रुग्णांना मोफत आरोग्य सेवा देण्याचा निर्धार केला आहे त्याच माध्यमातून नवजीवन इलेक्ट्रो होम होमिओपॅथिक रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेंटर आसेगाव पेन चे तज्ञ डॉक्टर श्री गजानन के खानझोडे सर यांच्या माध्यमातून मन्नास पिंपरी ठिकाणी संस्थांच्या वतीने उपलब्ध करून आरोग्य तपासणी करून गरजू रुग्णांना सेवा देण्याचे काम मोफत करत आहोत त्यामध्ये भरपूर रुग्णांनी त्याचा लाभ घेतला या कार्यक्रमांमध्ये संस्थेचे सचिव बालाजी बांगर हे सुद्धा हजर होते यापुढे सुद्धा असेच उपक्रम राबवण्याचा संस्थेच्या अध्यक्षांनी घेतला आहे



---

## रविवारी "श्रीमद भगवद गीता पठण" स्पर्धेची प्राथमिक फेरी; पनवेलमध्ये प्रथमच स्पर्धेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)** भारतीय जनता पार्टी पनवेल तालुका, संस्कार भारती पनवेल महानगर, संस्कृत भारती पनवेल आणि श्री गुरुकुलम न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या "श्रीमद भगवद गीता पठण" स्पर्धेची प्राथमिक फेरी रविवार दिनांक १६ नोव्हेंबर रोजी विभागनिहाय पनवेल, नवीन पनवेल, कामोठे आणि खांदा कॉलनी येथे आयोजित करण्यात आली आहे. विशेष म्हणजे प्रथमच अशा स्पर्धेचे आयोजन पनवेलमध्ये करण्यात आले आहे. लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेसाठी प्रवेश विनामूल्य आहे. सकाळी ९ ते दुपारी वाजेपर्यंत होणारी हि प्राथमिक फेरी शालेय आणि खुला अशा दोन गटात होणार आहे. शालेय गट फेरी पनवेल मधील लोकनेते दि. बा. पाटील




विद्यालय, नवीन पनवेल येथे सीकेटी विद्यालय, कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुल तर खुला गटातील फेरी खांदा कॉलनीमधील सीकेटी महाविद्यालयात होणार आहे. स्पर्धा प्रथम प्राथमिक आणि अंतिम फेरी अशा टप्प्यांत घेण्यात येणार आहे. प्रत्येक स्पर्धकाला सहभाग प्रमाणपत्र दिले जाणार असून विजेत्यांना रोख रक्कम सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

---

## कोळगाव येथील आरोग्य सेविकेचे धाडस!

### गाडीतच केली प्रसूती – आई व जुळी बालके सुखरूप!

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

निफाड (दि. १३ नोव्हेंबर) – "सेवा हीच ईश्वरसेवा" हे वचन प्रत्यक्ष कृतीत आणत कोळगाव (ता. निफाड) येथील आरोग्य सेविका सौ. साधना संजय घोटेकर यांनी प्रसंगावधान दाखवत गाडीतच प्रसूती करून आई व बालकांचे प्राण वाचवले. या घटनेने संपूर्ण परिसरात त्यांच्या धाडसाचे व सेवाभावाचे कौतुक होत आहे. कोळगाव येथील जाधव कुटुंबातील एका गर्भवती महिलेला पहाटे प्रसूतीवेदना सुरू झाल्या. प्रसंग गंभीर असल्याने कुटुंबीयांनी तातडीने आरोग्य सेविका साधना घोटेकर यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी प्रसंगाचे गांभीर्य लक्षात घेऊन गर्भवती महिलेला निफाड येथील दवाखान्यात घेऊन जाण्याचा निर्णय घेतला. मात्र, नैताळा परिसरात पोहोचताच प्रसूतीकळा तीव्र झाल्या आणि प्रसूती गाडीतच करावी लागणार होती. अंधारात, कुठलीही सुविधा नसताना फक्त मोबाईलच्या उजेडात साधना ताईंनी आपल्या १८ वर्षांच्या अनुभवाचा आधार घेत शांतपणे परिस्थिती हाताळली. महिलेला धीर देत आणि तिच्या आईच्या मदतीने त्यांनी गाडीतच पहिल्या बालकाची सुरक्षित प्रसूती केली. दुसऱ्या बालकाची प्रसूती निफाड येथील दवाखान्यात करण्यात आली. दोन्ही बालके आणि आई




सुखरूप असून, कुटुंबीयांनी साधना घोटेकर यांचे मनःपूर्वक आभार मानले. या घटनेमुळे कोळगाव परिसरात आरोग्य सेविकेच्या सेवाभावी वृत्तीबद्दल कौतुकाचा वर्षाव होत असून, ग्रामस्थांनी "अशा सेवाभावी आणि तत्पर कार्यकर्त्या हेच खरी जनतेची जीवनवाहिनी आहेत" असे गौरवोद्गार काढले.

---

## सोयाबीन, मुग व उडीद पिकाची खरेदीकरीता

### ऑनलाईन शेतकरी नोदणीची अंतिम मुदत 31 डिसेंबर

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी राहुल मडावी नागपूर**

नागपूर : हंगाम 2025-26 मध्ये केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत दरानुसार एनसीसीएफमार्फत सोयाबीन, मुग व उडीद पिकाची खरेदीकरीता ऑनलाईन शेतकरी नोदणी 30 ऑक्टोबर पासून सुरु झाली असून अंतिम दिनांक 31 डिसेंबर असा आहे. प्रत्यक्ष सोयाबीन, मुग व उडीद पिकाची खरेदी प्रक्रिया 15 नोव्हेबर पासून पुढील 10 दिवसासाठी खरेदी सुरु राहणार आहे.

खरेदी करीता आधारभूत दर पुढील प्रमाणे निश्चित केले आहे. मुग पिकासाठी दर प्रति क्विंटल 8 हजार 768 रुपये, उडीद पिकासाठी दर प्रति क्विंटल 7 हजार 8 रुपये तर सोयाबीन पिकासाठी दर प्रति क्विंटल 5 हजार 328 रुपये असे आहेत.

नागपूर जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य सहाकरी पणन महासंघाचे 7 उपअभिकर्ता संस्थाच्या 7 खरेदी केंद्राना मान्यता मिळाली आहे. तालुकानिहाय खरेदी केंद्र खालील प्रमाणे आहे. भिवापूर ता ख. वि. सं., भिवापूर, कळमेश्वर ता. ख. वि. सं., कळमेश्वर, काटोल ता.ख. वि. सं., काटोल, उमरेड ता. ख. वि. सं., उमरेड, नरखेड ता. ख. वि. सं., नरखेड, रामटेक ता. ख. वि. सं. रामटेक, सावनेर ता. ख. वि. सं.. सावनेर अशा आहेत.

वरील प्रमाणे 7 सोयाबीन खरेदी केंद्रांना शेतकरी नोदणीकरीता मंजुरी मिळाली आहे. तरी जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना जाहीर आवाहन करण्यात येते की जवळच्या नमूद खरेदी केंद्रावर जाऊन शेतकरी नोंदणी करण्यात यावी.

शेतकऱ्यांनी नोंदणी करण्याकरीता स्वतःचे आधारकार्ड, मोबाईल क्रमांक. चालू हंगामातील पीक पेरा नमूद सातबारा, नमुना आठ-अ, सामाईक सातबारा क्षेत्र असल्यास सर्वाचे आधारकार्ड सह संमती पत्र, अद्यावत बँक पासबुक झेरॉक्स आदी कागदपत्रांसह प्रत्यक्ष खरेदी केंद्रावर उपस्थित राहणे अनिवार्य आहे. तसेच खरेदीकरीता आपणास एसएमएस प्राप्त झाल्यानंतर शेतमाल विक्रीसाठी खरेदी केंद्रावर घेवून यावा व जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन पणन महासंघाचे अध्यक्ष दत्तात्रय पानसरे, उपाध्यक्ष रोहित निकम, व्यवस्थापकीय संचालक श्रीधर डुबे पाटील व संचालक मंडळांनी केले आहे.

---

## माहूरमधील जिल्हा परिषद केंद्र उर्दू प्राथमिक शाळेत शिक्षकांची कमतरता —गटशिक्षणाधिकाऱ्यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**
**माहूर :( प्रतिनिधी)** सय्यद ईसा शहरातील जिल्हा परिषद केंद्र उर्दू प्राथमिक शाळेत शिक्षकांची तीव्र कमतरता निर्माण झाली असून, जवळपास ३०० विद्यार्थी केवळ दोन शिक्षकांच्या भरोशावर शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने शाळेत तात्काळ शिक्षकांची नेमणूक किंवा प्रतिनियुक्ती देण्यात यावी, अशी मागणी करणारे निवेदन शहराध्यक्ष सय्यद सईद अली (राष्ट्रवादी काँग्रेस – अजितदादा पवार गट) यांनी गटशिक्षणाधिकारी माहूर यांना दिले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, या शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या मोठी असून शिक्षकांची अपुरी संख्या असल्यामुळे अभ्यासक्रम पूर्ण होण्यात



अडथळे येत आहेत. दोन शिक्षकांवर संपूर्ण शाळेचे शैक्षणिक, प्रशासकीय आणि इतर जबाबदाऱ्या येत असल्याने गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे कठीण बनले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात येत असून, तातडीने अतिरिक्त शिक्षकांची नेमणूक किंवा प्रतिनियुक्तीवर शिक्षक नेमावेत, अशी मागणी करण्यात आली.या प्रसंगी शेख मुसव्वीर शेख मुख्तर, शेख मुहीत, समद सौदागर,रिझवान सौदागर, गोलू सौदागर, आरसलान शेख तसेच इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

---

## अजित पवार सत्तेसाठी लाचार...

### सत्तेतून बाहेर पडण्याचा प्रश्नच नाही : हर्षवर्धन सपकाळ यांची टिका

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी :** राज्यातील ट्रिपल इंजिन महायुती सरकारमध्ये अंतर्गत वाद पराकोटीला गेले आहेत पण सत्तेसाठी हे सर्वजण एकत्र आले असून सत्तेसाठी काहीही व वाट्टेल ते अशी त्यांची भूमिका आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, उपमुख्यमंत्री अजित पवार सत्तेसाठी लाचार आहेत त्यामुळे सत्ता सोडून ते राहू शकत नसल्यानेच ते सत्तेतून बाहेर पडणार नाहीत, अशी खरपुस टिका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. काँग्रेस मुख्यालयात राज्य निवडणूक मंडळाची दोन दिवसांची बैठक पार पडली. विजय वडेट्टीवार, सतेज ऊर्फ बंटी पाटील, बी. एम. संदीप, नसीम खान, मोहन जोशी, वजाहत मिर्झा, ऍड. गणेश पाटील, सिद्धार्थ हत्तीअंबिरे, सचिन नाईक आदी प्रमुख नेते पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीनंतर प्रसार माध्यमांशी बोलताना सपकाळ म्हणाले की, या बैठकीत नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकीसाठी उमेदवार निश्चित करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली. स्थानिक नेतृत्वाशी चर्चा करून उमेदवारी निश्चित करण्यात आलेली आहे. प्रत्येक जिल्ह्यातील राजकीय समिकरणं वेगळी आहेत. स्थानिक पातळीवर समविचारी पक्षांशी चर्चा करून आघाडी करण्यात आली आहे. काही जिल्ह्यात वंचित बहुजन आघाडी, शेकाप, शेतकरी संघटना, रासप यांच्याशी आघाडी झालेली आहे. मनेसशी आघाडी करण्यासंदर्भात कोणत्याच जिल्ह्यातून प्रस्ताव आलेला नाही, असे सपकाळ यांनी सांगितले. यावेळी चंद्रपूर जिल्ह्यातील भाजप आमदार बंटी भागडिया यांचे कट्टर समर्थक आणि भाजप अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेश महामंत्री जुनेद खान यांनी आपल्या सहकाऱ्यांसह काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ व विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या उपस्थितीत काँग्रेस पक्षात प्रवेश केला. प्रदेशाध्यक्षांनी यांनी सर्वांचे स्वागत केले. महायुतीमध्ये फसवणूक झाल्याची भावना तीनही पक्षातील असंख्य पदाधिकाऱ्यांच्या मनात वाढीस लागलेली आहे. आगामी काळात सत्ताधारी पक्षातील अनेक महत्वाचे नेते काँग्रेस पक्षात प्रवेश करतील, असे सपकाळ म्हणाले..

---

## जिल्हापरिषद शाळेच्या चिमुकल्यांनी अनुभवला रेल्वेचा प्रथम प्रवास

**दैनिक युवक आधार**
शिरूर कासार प्रतिनिधी बीड जिल्ह्यात रेल्वे आली मात्र रेल्वच्या प्रवासाबाबत शालेय मुल अनभिज्ञच होते त्यांना रेल्वेचे कुतूहल होतेच ते शाळेच्या शिक्षकांनी सहलीच्या माध्यमातून पुर्ण केले. तालुक्यातून रेल्वे बीडला जाऊ लागली शिरूरसाठी विघनवाडी हे स्टेशन असल्याने जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक प्रशांत गाडेकर व शिक्षिका आरती डीमके यांनी शैक्षणीक सहल म्हणून विघनवाडी ते बीड असा प्रवास घडवून आणला. पहिल्यांदाच रेल्वेत बसलेल्या चिमुकल्यांनी खिडकीतून बाहेरच्या डोंगरद-या व झाडझुडूप मागे पळत असल्याचा भास अनुभवला.




---

## महापरिनिर्वाण दिनी चैत्यभूमी भेट अनुयायांसाठी प्रेरणादायी ठरेल.

### उपराष्ट्रपतींना विधानसभा उपाध्यक्षांचे निमंत्रण पत्र.

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी :** येत्या ६ डिसेंबर रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त दादर येथील चैत्यभूमीवर होणाऱ्या अभिवादन कार्यक्रमासाठी




उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांना आमंत्रित करण्यात आले आहे. विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी उपराष्ट्रपती यांना पत्र पाठवत निमंत्रण दिले आहे. उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी पत्रात म्हटले आहे की, "भारतरत्न mडॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधानाचे प्रमुख शिल्पकार आणि सामाजिक न्यायाचे समर्थक आहेत. समानता आणि सक्षमीकरणाच्या दिशेने राष्ट्राच्या मार्गाला त्यांनी आकार दिला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिनी लाखो अनुयायी दादर येथील चैत्यभूमीवर येत असतात. देशभरातील लाखो लोक श्रद्धा आणि कृतज्ञतेने त्यांना स्मरतात."महापरिनिर्वाण दिनी चैत्यभूमीवर आपली उपस्थिती डॉ. आंबेडकरांच्या कार्याचा सन्मान ठरेलच, तसेच त्यांच्या विचारांचे अनुयायींना प्रेरणा व नवचैतन्य देणारी ठरेल, असेही विधानसभा उपाध्यक्षांनी नमूद केले आहे.

विधानसभा उपाध्यक्षांनी पाठविलेल्या पत्रात उपराष्ट्रपतींच्या अनुकरणीय सार्वजनिक सेवेचे आणि देशाच्या लोकशाही मूल्यांप्रती असलेल्या वचनबद्धतेचे कौतुक करत, त्यांच्या निवडीबद्दल हार्दिक अभिनंदन व्यक्त केले आहे.

# आमदार संजय पुराम यांच्या हस्ते आमगाव-देवरीत विकासकामांचे भूमिपूजन; त्यानंतर तत्काळ तिगाव येथील आग पीडितांना आर्थिक मदतीसह प्रशासकीय मदतीचे निर्देश

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड जिल्हा प्रतिनिधी (गोंदिया ) आमगाव-तिगावः** आमगाव-देवरी विधानसभा क्षेत्राचे आमदार संजय पुराम यांनी मतदारसंघात एकाच दिवशी विकास आणि आपद्ग्रस्तांना मदतीचा दुहेरी संदेश दिला आहे. २० नोव्हेंबर २०२५, सोमवार रोजी आमदार संजय पुराम यांच्या हस्ते आमगाव परिसरातील विविध विकास कामांच्या भूमिपूजन समारोहाचे आयोजन करण्यात आले होते. दिवसभर चाललेल्या या महत्त्वपूर्ण सोहळ्यात, आमदार संजय पुराम आणि सविताबाई संजय पुराम यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच माजी आमदार भेरसिग नागपुरे,



माजी आमदार केशवरावजी मानकर, माजी अध्यक्ष जि. प. गोंदिया विजयजी शिवणकर यांसह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत हनुमान मंदिर वसंत नगर (आमगाव), पुरातन शिवमंदिर बहेकार मोहल्ला (आमगाव), शिव मंदिर सिव्हिल लाईल (रिसमा), हनुमान मंदिर कॉलेजटोली (पदमपूर) आणि माली-शंभुटोला रोड (शंभुटोला) येथे विविध विकास कामांचे भूमीपूजन करण्यात आले.

एकीकडे विकासकामांचा हा सोहळा पार पडत असतानाच, दुसरीकडे आमदार पुराम यांनी तिगाव येथील एका दुर्दैवी घटनेची तत्काळ दखल घेतली आणि विकास सोहळ्यानंतर त्यांनी तातडीने तिगाव गावी धाव घेतली. येथे ८ नोव्हेंबर २०२५ रोजी शॉर्टसर्किटमुळे गणपत हरिणखेडे यांच्या घराला भीषण आग लागून घरातील अनेक दैनंदिन आवश्यक वस्तू जळून खाक झाल्या होत्या. या नुकसानीची माहिती मिळताच आमदार पुराम यांनी स्वतः हरिणखेडे कुटुंबाच्या घरी जाऊन पाहणी केली आणि त्यांना धीर दिला.

"या संकटकाळात आम्ही आपल्यासोबत आहोत," असा दिलासा देत आमदार संजय पुराम यांनी हरिणखेडे परिवाराला भावनिक आधार देत स्वतःच्या वतीने थोड्या प्रमाणात आर्थिक मदत केली. यासोबतच, त्यांनी प्रशासनाला तातडीने झालेल्या नुकसानीचा पंचनामा करण्याचे आणि पीडित कुटुंबाला लवकरात लवकर योग्य भरपाई उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले. विशेष म्हणजे, त्यांनी तहसील प्रशासनाला जीवन आवश्यक वस्तू आणि खाद्यपदार्थ तातडीने उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट निर्देशित केले, ज्यानुसार कुटुंबाला त्वरित थोडीफार मदत पुरवण्यात आली आहे. आमदार पुराम यांच्या या त्वरित कृतीमुळे आणि संवेदनशील भूमिकेमुळे हरिणखेडे परिवाराला मोठा आधार मिळाला असून, त्यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# वानोळा जिल्हा परिषद शाळेत एक ते सात वर्गासाठी केवळ एकच शिक्षक

**दैनिक युवक आधार**
**माहूर : (प्रतिनिधी)** सय्यद ईसा माहूर तालुक्यातील वानोळा येथे जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत एक ते सात वर्गात दोनशे विद्यार्थी असून केवळ एकाच शिक्षकावर शाळा चालू आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य अंधारात असल्याची तक्रार गावकऱ्यांनी कुंभकर्णी झोपेत असलेल्या गटशिक्षण अधिकारी माहूर यांच्याकडे केली आहे. आठ दिवसात पूर्ण शिक्षक उपलब्ध न झाल्यास गटशिक्षण अधिकारी यांचे कार्यालयात आमरण उपोषण करणार असल्याचे निवेदनात कळविले आहे वानोळा येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेतील सर्व सात शिक्षकांची बदली एकाच वेळी झाली असून येथे दोन शिक्षक प्रतिनियुक्तीवर पाठविण्यात आले होते. यापैकी एक





शिक्षक मागेवाढ हे विविध कारणाने गैरहजर असून 200 विद्यार्थ्यांना केवळ एकच शिक्षक असल्याचे ने विद्यार्थ्यांना एकच शिक्षक पूर्ण शिक्षण कसा देऊ शकतो असा प्रश्न कुंभकर्णी झोपेत असलेल्या शिक्षण विभागाला करण्यात आला आहे. पुढील आठ दिवसात पूर्ण शिक्षक उपलब्ध करून द्यावे तसेच मागेवाढ या शिक्षकांना इतर ठिकाणी पाठवावे अन्यथा गट शिक्षण अधिकारी माहूर यांचे कार्यालयात आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचे शिक्षण समितीचे सदस्य व गावकऱ्यांनी निवेदनाद्वारे कळविले आहे.

# वझरा शेखफरीद हे गाव संरक्षण सेवेचे गाव म्हणून नाव लौकिक

**दैनिक युवक आधार**
**श्री क्षेत्र माहूरः (प्रतिनिधी)**
सय्यद ईसा अतिदुर्गम आदिवासी डोंगराळ भागात वसलेले आणि डोंगरमाथ्याच्या पायथ्याशी असलेले देवी देवतांच्या मध्यभागी असलेले छोट्स खेड गाव म्हणजे वझरा शेखफरीद तालुका माहुर जि.नांदेड. या गावात अगोदर कोणीही सरकारी सेवेत नव्हते परंतु कोणताही वारसा गावाला लाभला नसून आता गावाचा विविध सेवेत जवळपास शतक पूर्ण आकडा करण्याच्या मार्गावर आहे. विशेष म्हणजे पोलीस दल मुले12 मुली 5 एकुन 17, वनरक्षक- 1, सैन्यदल - 3, अग्नीशामक 3, वैधकीय क्षेत्र 2 मुली, पोस्ट खाते-2 महसूल खाते - 1, महाराष्ट्र सुरक्षा रक्षक, (M.S.F.) 4, वकील क्षेत्र 2, पंचायत समिति लिपिक 1, होमगार्ड-3, ग्रामसेवक-1, पशु वैदिकिय डॉक्टर -1, मैस्को सुरक्षारक्षक 5, शिक्षक व शिक्षकत्तर - 8 व इतर सुरक्षारक्षक - 10 असे मुली व मुल सेवा बजावत आहे हे विशेष. या गावात इयत्ता पहिली ते सातवी पर्यंत जिल्हा परीषद उच्च प्राथ शाळा, शिक्षण महर्षी कै. माधवराव पांडागळे साहेबांच्या कर्तत्वातून आदरणीय बालाजी पांडागळे साहेबांनी सन 2001 मध्ये उभा केलेली कै. गोंविदराव पाटील मा. व उच्च मा. विद्यालय या शाळेत इयत्ता पाचवी ते बारावी सायन्स, आर्ट्स अशी भव्य इमारत उभी केली या शाळेमुळे आणि तेथे कार्यरत सर्व शिक्षका मुळे हे विद्यार्थी घडत आहे असे म्हणने वावगे ठरणार नाही. सर्वच क्षेत्रात महाराष्ट्रात सर्वदुर ही मुले आपली सेवा बजावत आहेत आता फक्त अपेक्षा आहे ती मोठा अधिकारी होण्याची तर बघुया हे गावाचे स्वप्न कोण पूर्ण करते ते बस एवढेच.

# मुगट नगरीत सौ. सारिका संदीप हाटकर यांची पंचायत समिति मुदखेड सदस्य पदासाठी कॉर्ग्रेस पक्षाची उमेदवारी चर्चेत...

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी** : प्रकाश गवारे मुदखेड तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा माहोल आता चांगलाच रंगात आला असून, मुगट गाव व परिसरात सध्या चर्चेचा केंद्रबिंदू ठरलेली उमेदवारी म्हणजे सौ. सारिका संदीप हाटकर यांची पंचायत समिती मुदखेड सदस्य पदासाठीची इच्छुक उमेदवारी. सौ. हाटकर या गावातील प्रतिष्ठित व कार्यक्षम हाटकर परिवारातील प्रतिनिधी असून, त्या माजी सरपंच सौ. शांताबाई मनोहर हाटकर यांच्या सून आहेत. तसेच अड. माधव मनोहर हाटकर, जे वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष श्रद्धेय बाळासाहेब आंबेडकर साहेब यांचे निष्ठावान कार्यकर्ते आहेत, यांच्या लहान भावांच्या पत्नी आहेत. राजकारणाची परंपरा, सामाजिक बांधिलकी आणि विकासाभिमुख विचारसरणी यांचा वारसा त्यांनी आपल्या कार्यातून जोपासला आहे. महिला सक्षमीकरण, शिक्षण, आरोग्य आणि ग्रामविकास या क्षेत्रात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. गावातील महिला बचतगट, महिला मंडळे आणि स्थानिक



महीला कार्यकर्त्यांशी सातत्याने संवाद ठेवून त्यांनी विविध सामाजिक उपक्रम राबविले आहेत. त्यांच्या संवेदनशील नेतृत्वशैलीमुळे ग्रामस्थांमध्ये त्यांच्याबद्दल आत्मीयता व विश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. मुगट गणातील नागरिकांमध्ये सध्या त्यांच्या उमेदवारीबाबत चर्चेला जोर आला असून, सौ. सारिका संदीप हाटकर या पंचायत समिती मुदखेड सदस्य पदाच्या शर्यतीत प्रभावी, लोकप्रिय आणि आश्वासक उमेदवार म्हणून उदयास येत आहेत. स्थानिक नेते आणि कार्यकर्त्यांनीही त्यांच्या उमेदवारीस पाठिंबा दर्शविला आहे.

अवधूत गोविंदराव कल्याणे
गजानन विजयराव कल्याणे युवक कॉंग्रेस उपतालुका अध्यक्ष
शंकर गोपीनाथराव मुंगल,
रोहित रामराव कल्याणे
अनिल शंकरराव कल्याणे

आदींनी सौ. हाटकर यांच्या उमेदवारीबाबत सकारात्मक भूमिका घेतली आहे. मुगट परिसरात चर्चेचा विषय बनलेली ही उमेदवारी आगामी निवडणुकीत मोठे राजकीय समीकरण निर्माण करू शकते, अशी चर्चा सध्या रंगली आहे.

# आगामी नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकीसाठी राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून 40 स्टार प्रचारकांची यादी जाहीर...

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी**
: आगामी नगरपरिषद व नगरपंचायत सार्वत्रिक निवडणुकीसाठी राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून ४० स्टार प्रचारकांची यादी प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी जाहीर केली आहे.
या स्टार प्रचारकांमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, माजी मंत्री धनंजय मुंडे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, कृषीमंत्री दत्तात्रय भरणे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, महिला व बालविकास मंत्री अदितीताई तटकरे, पर्यटन राज्यमंत्री इंद्रनील नाईक, माजी मंत्री धर्मरावबाबा आत्राम, माजी मंत्री अनिल भाईदास पाटील, माजी मंत्री संजय बनसोडे, आमदार प्रताप पाटील - चिखलीकर, माजी मंत्री नवाब मलिक, नेते सयाजी शिंदे, अल्पसंख्याक महामंडळाचे अध्यक्ष मुश्ताक अंतुले, माजी खासदार समीर भुजबळ, आमदार अमोल मिटकरी, आमदार सना मलिक - शेख, महिला प्रदेशाध्यक्षा रुपालीताई चाकणकर, आमदार इद्रीस नायकवडी, माजी आमदार अनिकेत तटकरे, माजी आमदार झिशान सिद्दीकी, माजी आमदार राजेंद्र जैन, मुंबई कार्याध्यक्ष सिध्दार्थ कांबळे, प्रदेश सरचिटणीस सुरज चव्हाण, लहू कानडे, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, सामाजिक सेलचे प्रदेशाध्यक्ष सुनिल मगरे, अल्पसंख्याक सेलचे प्रदेशाध्यक्ष नाझेर काझी, महेश शिंदे, श्रीमती राजलक्ष्मी भोसले, सुरेखाताई ठाकरे, नजीब मुल्ला, श्रीमती प्रतिभाताई शिंदे, विकास पासलकर आदींचा समावेश आहे

# माध्यमिक विद्यामंदिर गोंदेगाव ता. निफाड विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा!

## इन्स्पायर अवार्ड प्रदर्शनामध्ये जिल्हास्तरावरील मॉडेलची राज्यस्तरावर निवड

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**
**गोंदेगाव (ता. १२ नोव्हेंबर)** – विज्ञान-तंत्रज्ञानाच्या नवकल्पनांमध्ये ग्रामीण विद्यार्थ्यांचा उत्साह आणि कौशल्य पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. माध्यमिक विद्यामंदिर, गोंदेगाव (ता. निफाड) या विद्यालयाने इन्स्पायर अवार्ड प्रदर्शनात आपली छाप उमटवत जिल्हास्तरावरून थेट राज्यस्तरावर मजल मारली आहे. दि. १० ते १२ नोव्हेंबर या तीन दिवसांत पार पडलेल्या जिल्हास्तरीय इन्स्पायर अवार्ड प्रदर्शनात विद्यालयाचे विद्यार्थी कु. सुमित संभाजी शिंदे आणि कु. ओम आनंदा घुगे (इ. १०वी) यांनी सौरऊर्जेवर चालणारे “कांदा पात कापणी यंत्र” सादर केले. त्यांच्या या अभिनव कल्पनेला परीक्षकांकडून विशेष दाद मिळाली आणि या मॉडेलची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. या यशामागे विद्यालयाचे गणित व विज्ञान विषयाचे शिक्षक श्री. दत्ता कुटे सर यांचे मार्गदर्शन




विशेष उल्लेखनीय ठरले आहे. त्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांना मिळालेले प्रेरणादायी मार्गदर्शन या यशाचा पाया मानला जात आहे. या अभिमानास्पद कामगिरीबद्दल संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सरचिटणीस, सहचिटणीस, विश्वस्त, संचालक, पालक संचालक, सेवक संचालक, शिक्षणाधिकारी, विद्यालयाचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थीवर्ग यांनी विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक शिक्षकांचे हार्दिक अभिनंदन केले आहे. *बॉक्स* *गोंदेगाव विद्यालयाने नवकल्पनेचा नवा झेंडा फडकवला असून, या यशामुळे संपूर्ण तालुक्याचा अभिमान वाढला आहे.*

# ज्येष्ठ पत्रकार संजय कदम व आप्पासाहेब मगर यांची वंदे मातरम 150 व्या वर्धापनदिन शासकीय तालुकास्तरिय समितीवर नियुक्ती

बंकीमचंद्र चटटोपध्याय यांनी 1857 साली लिहिलेले वंदे मातरम या गीतास स्वातंत्र लढयात तसेच स्वातंत्रोत्तर कालखंडातही अनन्ययाधारण महत्व प्राप्त आहे. आनंदमठ या कादंबरीतील हे गीत भारतमातेच्या स्तुतीचे प्रतीक असून, स्वातंत्र्य लढयातील असंख्य क्रांतीकारकांना प्रेरणादायी ठरलेले आहे. या गीतास दिनांक. 07 नोव्हेंबर, 2025 रोजी 150 वर्ष पूर्ण होत आहे.त्यानिमित्ताने शासन निर्णयानुसार, राज्यातील सर्व तालुक्यांमध्ये वंदे मातरम गीताच्या 150 व्या वर्धापन दिनाचे यशस्वी आयोजनासाठी अपर तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरिय समिती स्थापन करण्यात येत आहे.





यामध्ये पनवेलमधील ज्येष्ठ पत्रकार संजय कदम व खारघर येथील ज्येष्ठ पत्रकार आप्पासाहेब मगर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या कमिटीमध्ये अप्पर तहसीलदार पनवेल जितेंद्र इंगळे हे अध्यक्ष, गटविकास अधिकारी समीर वाठारकर सदस्य, सहा.आयुक्त कौशल्य विकास मोहसीन वस्ता, प्रतिनिधी, सदस्य गटशिक्षणाधिकारी शाहू सकपाळ, जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी पिल्ले सर, महाराष्ट्र राज्य कौशल्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळाचे प्राधिकृत प्रशिक्षण संस्था, प्रतिनिधी योगेश पाटील, अध्यक्ष व ज्योती लोहार सचिव, पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे, शिक्षण संस्था प्रतिनिधी वाय. टी.देशमुख व राजेंद्र पालवे, संत श्रीकांतजी महाराज मोहोकर, क्रिडापटू प्रसाद ढवळे, विवेक सावंत, साहित्यिक गणेश म्हात्रे, सुनिता खरे, पत्रकार संजय कदम, आप्पासाहेब मगर, गडकिल्ले संवर्धन समिती सदस्य सागर मुंढे, प्रतिक चाचड, उद्योजक प्राग्वंश पाटील, संदीप मोहिते, महिला बचत गट प्रमुख अंजली इनामदार, स्वाती पवार, स्वयंसेवी संस्था प्रतिनिधी जाणीव एक सामाजिक संस्था, पनवेल, जागृती मित्र मंडळ, केदार भगत मित्र मंडळ व औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य विजय तिकोले आदी मान्यवर या समितीमध्ये सहभागी असल्याची माहिती अप्पर तहसीलदार पनवेल जितेंद्र इंगळे यांनी दिली.

# हणेगावात शिवसेनेला खिंडार

## तर भारतीय जनता पक्षाला बळ शिवसेनेचे कट्टर समर्थक प्रविण इनामदार यांचे भारतीय जनता पक्षात प्रवेश.

**दैनिक युवक आधार**
**तालूका प्रतिनिधी :महादेव उप्पे**



मागील काही दिवसांपासून देगलूर तालुक्यात पक्षांतर मोठ्या प्रमाणात होत असून जून्या निष्ठावंत कार्यकर्त्यांचा विचार न करता आयात कार्यकर्त्यांवर विश्वास दर्शवित असल्यामुळे जुन्या कार्यकत्यांचा जिव घुडमळत असल्यामुळे ऐन जिल्हा परिषद पंचायत समितीच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या तोंडावर हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या तालमीत तयार झालेले,हिंदुऱ्हदयसम्राट बाळासाहेब हिंदुत्वाची जान असलेले व वीस ते पंचविस वर्षापासून एकाच पक्षात राहून शिवसैनिकांच्या ऱ्हदयात आदराचे स्थान पक्के केले असे हणेगाव येथील प्रविण विठ्ठलराव इनामदार यांनी शिवसेना पक्षाला सोडचिठ्ठी देत भारतीय जनता पक्षात प्रवेश केले.

या प्रवेशाने येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला मोठा फायदा होईल असे मत या भागातील भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडून बोलले जात आहे.

# पिंपळगाव बसवंत शहराच्या विकासासाठी ऐतिहासिक पाऊल भास्करराव (नाना) बनकर यांचा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात प्रवेश!

**दैनिकः युवक आधार**
**प्रतिनिधी – कृष्णा गायकवाड,**
पिंपळगाव बसवंत आजचा दिवस पिंपळगाव बसवंत शहराच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिला जाईल, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी दृढनिश्चयाने काम करणारे विकासपुरुष आदरणीय श्री. भास्करराव (नाना) बनकर यांनी आज आपल्या शेकडो समर्थकांसह महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आदरणीय नामदार श्री. अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. या प्रवेशामुळे पिंपळगाव बसवंतच्या विकासाला नवी दिशा मिळणार असून, नागरिकांच्या अपेक्षांना नवा वेग मिळेल, अशी भावना स्थानिक पातळीवर व्यक्त केली जात आहे. नाना बनकर यांनी नेहमीच शहराच्या प्रगतीसाठी आणि जनसामान्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी पुढाकार घेतला आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली शहरातील प्रलंबित कामांना गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी नाना बनकर यांच्या निर्णयाचे स्वागत करत, “आपण घेतलेले



हे पाऊल शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारे ठरेल,” असे मत व्यक्त केले. महायुती सरकारच्या माध्यमातून नागरिकांना दिलेली वचने पूर्ण करण्यासाठी आपण सर्वजण एकजुटीने प्रयत्न करू, असे नाना बनकर यांनी सांगितले. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी या प्रवेशाचे स्वागत करत, “आपल्या कार्यकर्त्यांचा मान-सन्मान राखला जाईल, तसेच योग्य वेळी योग्य स्थान दिले जाईल,” असे आश्वासन दिले. त्यांच्या आश्वासनामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे. पिंपळगाव बसवंत शहरात या प्रवेशामुळे राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल होण्याची चिन्हे दिसत आहेत. शहराच्या विकासाचा नवा अध्याय आज सुरू झाला असून, “भास्करराव बनकर यांच्या नेतृत्वाखाली शहर नक्कीच प्रगतीच्या नव्या उंचीवर पोहोचेल,” असा विश्वास नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे.

# पिंपळगाव बसवंत येथे राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) मध्ये जाहीर प्रवेश

## मा. सरपंच भास्करराव नाना बनकर यांच्यासह कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश

**दैनिकः युवक आधार**
**/प्रतिनिधी- कृष्णा गायकवाड (पिंपळगाव बसवंत)**
निफाड तालुक्यातील पिंपळगाव बसवंत येथील प्रिमिला लॉन्स येथे आज दिनांक १२ नोव्हेंबर २०२५ रोजी ज्येष्ठ नेते आणि माजी सरपंच मा.श्री. भास्करराव (नाना) बनकर यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष (अजित पवार गट) मध्ये जाहीर प्रवेश केला. या कार्यक्रमास स्थानिक नागरिक, कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रवेश प्रसंगी बोलताना मा. भास्करराव (नाना) बनकर यांनी सांगितले की, "मा. अजितदादा पवार यांच्या विकासाभिमुख नेतृत्वावर माझा पूर्ण विश्वास असून, त्यांच्या नेतृत्वाखाली गाव आणि तालुक्याचा विकास होईल, याची खात्री आहे." त्यांनी पिंपळगाव बसवंत शहर आणि परिसरातील विकासासाठी एकजूट होऊन कार्य करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे (अजित पवार गटाचे) पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन स्व. अशोकराव बनकर पतसंस्थेच्या सभागृहात करण्यात आले होते. संपूर्ण परिसरात या



प्रवेशामुळे नवचैतन्य निर्माण झाले असून, आगामी निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) अधिक बळकट होणार आहे. या प्रवेशामुळे निफाड तालुक्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या (अजित पवार गट) संघटनात्मक बळकटीला चालना मिळणार असून, कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल लोणकर यांनी केले तर आभार प्रदर्शन नगरसेवकांनी केले.

# खारघरमध्ये 12 कोटी 40 लाखांच्या निधीतून दैनंदिन बाजारांची निर्मिती

## पनवेल महापालिकेमार्फत खारघरचा विकास गतिमान — माजी सभागृहनेते परेश ठाकूर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**
सिडकोने खारघर परिसराचा अपेक्षित पद्धतीने विकास न केल्यामुळे नागरिकांना तसेच व्यापाऱ्यांना अनेक मूलभूत सुविधांचा अभाव जाणवत होता. सिडकोकडून सर्व सोयी-सुविधा उपलब्ध व्हाव्यात अशी अपेक्षा होती, मात्र ते शक्य झाले नाही. या पार्श्वभूमीवर आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नांमुळे पनवेल महानगरपालिकेची स्थापना झाली आणि महापालिकेच्या माध्यमातून आता खारघर शहरात वेगाने



आणि नियोजनबद्ध विकास होत असून नागरिकांना विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत, असे प्रतिपादन पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी केले. ते खारघरमध्ये आयोजित दैनंदिन बाजारांच्या भूमिपूजन कार्यक्रमावेळी बोलत होते. या बाजारांची निर्मिती आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या पुढाकारातून करण्यात येत असून एकूण १२ कोटी ४० लाख २३ हजार ६९१ रुपयांच्या निधीतून खारघरमधील १५ भूखंडांवर दैनंदिन बाजार उभारले जाणार आहेत. या कामांचे भूमिपूजन माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी पार पडले. यावेळी खारघर शहर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, गुरुनाथ गायकर, निलेश बाविस्कर, नरेश ठाकूर, माजी नगरसेविका हर्षदा उपाध्याय, नेत्रा पाटील, कीर्ती नवघरे, उपाध्यक्ष संजय घरत, समीर कदम, प्रभाग क्रमांक ६ चे अध्यक्ष वासुदेव पाटील, उपाध्यक्ष किरण पाटील, शहर उपाध्यक्ष अजित अडसूळ, अमर उपाध्याय, खारघर शिवसेना अध्यक्ष प्रसाद परब, भाजप महिला मोर्चा शहर अध्यक्षा साधना पवार, युवा मोर्चा शहर अध्यक्ष नितेश पाटील, प्रवीण बेरा तसेच पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

# मतदान जनजागृती रॅली नवी आबादी शाळेचा उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी योगेश चौदंते मुदखेड**
आज दिनांक 13 नोव्हेंबर 2025 रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नवी आबादी, मुदखेड येथे निवडणूक प्राधान्य स्वीप कक्षा अंतर्गत प्रभावी मतदान जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीत शाळेतील विद्यार्थी विविध पारंपरिक वेशभूषेत सजून गावातील प्रत्येक गल्लीबोळातून फिरले. विद्यार्थ्यांनी उत्साहाने नारे देत नागरिकांना मतदानाचे महत्त्व पटवून दिले – "चला मतदानाला, लोकशाही मजबूत बनवू या!" या कार्यक्रमास गटशिक्षणाधिकारी श्रीमती प्रिया डहाळे मॅडम प्रमुख उपस्थित होत्या. तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती केंद्रे एन. पी., सहशिक्षिका श्रीमती गुरमे मॅडम आणि सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांनी समाजात जागरूक नागरिक बनण्याचा संदेश



दिला आणि "मतदान हा लोकशाहीचा उत्सव आहे" हे अधोरेखित केले.

# दैनिक युवक आधार व युवा ग्रामीण पत्रकार संघटनेच्या टीमने केला चिखलीचे नूतन दबंग ठाणेदार भूषण गावंडे यांचा सत्कार..

**दैनिक युवक आधार**
चिखली तालुका प्रतिनिधी सिद्धार्थ धंदरे दिनांक 13 नोव्हेंबर रोजी चिखलीचे नूतन युवा दबंग ठाणेदार आदरणीय भूषण गावंडे यांचा दैनिक युवक आधार व राष्ट्रीय युवा ग्रामीण पत्रकार संघटनेच्या टीमने सत्कार करुन पुढील वाटचालीसाठी खुप साऱ्या शुभेच्छा दिल्या,ठाणेदार संग्राम पाटील यांची बदली होऊन त्या ठिकाणी ठाणेदार भूषण गावंडे हे रुजू झाले आहेत,ठाणेदार भूषण गावंडे हे या अगोदर बुलढाणा येथे कार्यरत होते. ठाणेदार भूषण गावंडे यांच्या विषयी सांगायचं झालं तर अभ्यासू व्यक्तिमत्व, नियोजनबद्ध कार्यक्रम आणि सर्वांना न्याय कसा देता येईल हे डोळ्यासमोर ठेवून ते वाटचाल करत असतात. गुन्हेगारी करणाऱ्या व नियम मोडणाऱ्या भामट्यांच्या मुसक्या कशा आवळायच्या आणि वठणीवर कसं आणायचं यांचा चांगलाच अभ्यास ठाणेदार भूषण गावंडे यांना आहे.चिखलीकरांना याचा अनुभव काही दिवसातच येईल यात काही शंका नाही.दैनिक युवक आधार व राष्ट्रीय युवा ग्रामीण पत्रकार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आदरणीय ठाणेदार साहेबांसोबत बऱ्याच विषयावरती चर्चा केली. यावेळी राष्ट्रीय युवा ग्रामीण पत्रकार संघटनेचे बुलढाणा जिल्हाध्यक्ष तथा दैनिक युवक आधारचे चिखली तालुका प्रतिनिधी सिद्धार्थ धंदरे,दैनिक युवक आधार वाशिम जिल्हा प्रतिनिधी तथा राष्ट्रीय युवा ग्रामीण पत्रकार संघटनेचे वाशिम जिल्हाध्यक्ष करण धोंगडे,राष्ट्रीय युवा ग्रामीण संघटनेचे बुलढाणा जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र लहाने,राष्ट्रीय युवा ग्रामीण पत्रकार संघटनेचे चिखली ग्रामीण तालुकाध्यक्ष रंगनाथ सावळे पाटील,राष्ट्रीय युवा ग्रामीण पत्रकार संघटनेचे चिखली तालुकाध्यक्ष प्रवीण डोंगरदिवे आझाद समाज पार्टी जिल्हा अध्यक्ष बुलढाणा भाई सिद्धांत वानखेडे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते..




# गोळ्या झाडून व्यावसायिकाचा खून करणाऱ्या संशयितांच्या शोधात पाच पथके रवाना

**पिंपरी** : चऱ्होलीतील वडमुखवाडी येथील खडी मशीन रस्त्यावर एका व्यावसायिकाला कारमध्ये बसवून त्याच्यावर गोळ्या झाडून त्याचा खून केला. ही घटना बुधवारी (दि. १२ नोव्हेंबर) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास घडली. या प्रकरणातील संशयित पळून गेले असून त्यांच्या शोधात पिंपरी-चिंचवड पोलिसांची पाच पथके रवाना करण्यात आली आहेत. नितीन शंकर गिलबिले (वय ३८, रा. वडमुखवाडी, चऱ्होली) असे खून झालेल्या व्यावसायिकाचे नाव आहे. याप्रकरणी नितीन यांचे भाऊ सचिन शंकर गिलबिले (वय ४०) यांनी दिघी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार अमित जीवन पठारे (रा. पठारे मळा, चऱ्होली), विक्रांत सुरेश ठाकूर (रा. सोलू, ता. खेड) यांच्या विरोधात गुरुवारी (दि. १३ नोव्हेंबर) गुन्हा दाखल करण्यात आला. नितीन गिलबिले हे जमीन खरेदी विक्रीचा व्यवसाय करत होते. त्यांनी मागील काही महिन्यांपूर्वी अलंकापुरम रस्त्यावर हॉटेल देखील सुरू केले होते. व्यावसायिक गाळे बांधून ते भाड्याने दिले होते. बुधवारी सायंकाळी नितीन खडी मशीन रस्त्यावर काही लोकांसोबत बोलत थांबले होते. त्यावेळी संशयित कार घेऊन आले. त्यांनी नितीन यांना कारमध्ये बसवले आणि नितीन यांच्या हॉटेलच्या दिशेने निघून गेले. संशयितांनी नितीन यांच्यासोबत वाद घालून त्यांच्यावर गोळीबार केला. यामध्ये नितीन यांचा जागीच मृत्यू झाला. खून केल्यानंतर संशयितांनी नितीन यांचा मृतदेह रस्त्याच्या कडेला मोकळ्या जागेत टाकून पळून गेले. हत्येचे कारण अद्याप समोर आलेले नाही. दरम्यान, या प्रकरणातील संशयिताचा पोलिसांकडून शोध सुरू आहे. दिघी पोलिस आणि गुन्हे शाखेची पाच पथके संशयितांच्या मागावर पाठवण्यात आली आहेत. लवकरच संशयितांना अटक केली जाईल, असे वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रमोद वाघ यांनी सांगितले.

**सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसली घटना**
दरम्यान, या घटनेचे सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे. संशयितांनी कारमध्ये गोळी झाडून नितीन गिलबिले यांचा खून केला. त्यानंतर रस्त्याच्या कडेला नितीन यांचा मृतदेह टाकून संशयित कार घेऊन पसार झाल्याचे सीसीटीव्ही फुटेजमधून दिसत आहे.

# सेलू नगर परिषद निवडणुकीत चौथ्या दिवशी तिघांचे अर्ज दाखल

**दैनिक युवक आधार**
सेलू प्रतिनिधी शिवाजी पावर नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेला सुरुवात होऊन चार दिवस उलटले असताना, गुरुवारी (दि. १३ नोव्हेंबर) तीन अपक्ष उमेदवारांनी निवडणुकीत आपले अर्ज दाखल केले आहेत.
निवडणूक विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार, प्रभाग क्रमांक १० (ब) मधून सना सोहेल व सत्यनारायण पन्नालाल तिवारी यांनी, तर प्रभाग क्रमांक ३ (अ) मधून विकास प्रभाकरराव धापसे यांनी अपक्ष उमेदवार म्हणून अर्ज सादर केले आहेत.
दरम्यान, नगराध्यक्ष पदासाठी अद्याप एकाही उमेदवाराने अर्ज दाखल केलेला नसल्याचे स्पष्ट झाले आहे. प्रमुख राजकीय पक्षांचे इच्छुक अद्याप तयारीच्या टप्प्यात असल्याने, कुठल्याही प्रमूख पक्षांच्या उमेदवाराने अर्ज दाखल केला नसल्याचे समजते अखेरच्या दिवशी उमेदवारांची मोठी गर्दी पाहायला मिळेल असे अपेक्षित आहे.




# निधन वार्ता

दैनिक युवक आधार
तालुका प्रतिनिधी योगेश चौदंते मुदखेड.



मुदखेड शहरातील माजी नगरसेविका श्रीमती कमलबाई भगवानराव कांबळे यांची कन्या आणि एस.टी. महामंडळातील कर्मचारी कल्पना रवी नरवाडे (भगवानराव कांबळे) यांचे दिनांक १२ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास हृदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले आहे. त्यांची अंत्ययात्रा दिनांक १३ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १:०० वाजता, राहते घर भिमनगर, मुदखेड येथून बौद्ध स्मशानभूमीकडे निघणार आहे. त्यांच्या निधनाने मुदखेड शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे. भावपूर्ण श्रद्धांजली

# पनवेल परिसरातील घरफोडीच्या तीन घटनाने नागरिक धास्तावले

**दैनिक युवक आधार पनवेल,** (वार्ताहर) पनवेल शहरासह , खांदेश्वर वसाहत व खारघर उपनगर येथे झालेल्या तीन वेगवेगळ्या घडफोडीच्या घटनांनी येथील नागरिक धास्तावले आहेत . पनवेल शहरातील टिळक रस्त्यावरील मॅस्ट्रो वास्तू दुकानातून दुकानदाराने दुकान बंद केल्यावर रात्रीच्या वेळी दुकानाच्या छताचे पन्ने तोडून दुकानातील नवरत्न स्टोन आणि रोख रक्कम असा १ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरला. अशीच स्थिती खांदेश्वर वसाहतीची आहे. मध्यरात्री सेक्टर १५ येथील प्रजापती आर्केड या इमारतीमधील गाळा क्रमांक १० मधील हॉटेलचे शटर तोडून ७० हजार रुपयांची चोरी केली. तर खारघर उपनगरात मध्यरात्री सेक्टर ३५ या रेझा ग्रॅन्ड ओव्हर या इमारतीची सुरक्षा यंत्रणा चांगली आहे. मात्र या इमारतीच्या मागील मोकळ्या जागेवरून प्रवेश करत, चार चोरटे इमारतीमधील वाहनतळात शिरले. पहाटे चार वाजता सुरक्षारक्षक झोपले असताना चोरांनी सोसायटीतील तिसऱ्या मजल्यावरील सदनिकेत प्रवेश केला. या घरातील गृहिणी आणि त्यांच्या दोन मुली झोपल्या असताना घरात काहीतरी हालचाल झाल्याचे या महिलेच्या ध्यानात आले. चोरटे त्यांच्या घरात खिडकीवाटे शिरल्याचे बाहेर पडताना पाहिले. यानंतर सीसीटीव्ही चित्रीकरण तपासल्यावर चोरट्यांनी वाहनतळात शिरल्यानंतर शिडीवाटे तिसऱ्या मजल्यावरील घरात प्रवेश करून मोबाइल व पन्नास हजार चोरले. याबाबतच्या तक्रारी संबंधित पोलीस ठाण्यात आल्या आहेत .प्रकरणी राजस्थान राज्यातील चार जणांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

# ३ आयफोनच्या खरेदीत पावणेतीन कोटींचे नुकसान

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)** आयफोनचा व्यवसाय करणाऱ्या एका व्यापाऱ्याने ६०० आयफोन खरेदीच्या ऑर्डरमध्ये झालेल्या फसवणुकीत २ कोटी ७५ लाख रुपये गमावल्याची घटना पनवेलमध्ये घडली आहे. याबाबत चार जणांविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे. पनवेल शहरातील ४९ वर्षीय व्यापारी विशाल ट्रेडिंगचा व्यवसाय करतात. ऑगस्ट महिन्यात संबंधित व्यापाऱ्याने ६०० मोबाइल फोन निर्यातीकरिता ऑर्डर दिली होती. या आयफोनची किंमत २ कोटी ७५ लाख ५७ हजार एवढी असून संबंधित व्यापाऱ्याने कंपनीला रक्कम दिल्यानंतरही मोबाइल फोन मिळत नसल्याने व्यापाऱ्याने दिलेल्या रकमेचा परतावा मागितला. यानंतरही कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याने व्यापाऱ्याने पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवण्यात आली. पोलिसांनी या

# शनिवारी पनवेलमध्ये साहित्यिकांचा गौरव सोहळा आणि कवी संमेलनाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर) :** श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल व पनवेल शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी पनवेलमध्ये साहित्यिकांचा गौरव सोहळा आणि कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.









लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या समारंभासाठी महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध हास्य कवी अशोक नायगावकर,सुप्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे,ज्येष्ठ गझलकार ए.के.शेख आदी उपस्थित राहणार आहेत.शनिवार दि.१५ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजता पनवेलच्या मार्केटयार्ड येथील श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ सभागृह येथे समारंभ संपन्न होणार आहे. या सोहळ्यात लोकनेते माजी खासदार यांनी आपल्या ७५ व्या वर्षात पदार्पण केल्याबद्दल त्यांचा सत्कार तसेच साहित्यिकांचा सत्कार आणि कवी संमेलन संपन्न होणार आहे.सहभागी कवींना प्रमाणपत्र आणि स्मृतीचिन्ह आयोजकांच्यावतीने दिले जाणार आहे,या सोहळ्यासाठी आपण सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी,पनवेल शाखेचे अध्यक्ष सुभाष कुडके यांनी केले आहे.

# नामनिर्देशनपत्रातील माहितीसोबत संकेतस्थळावर

## कागदपत्र अपलोड करण्याची आवश्यकता नाही

## शनिवारी (ता. १५ )देखील नामनिर्देशनपत्र स्वीकारणार

**दैनिक युवक आधार**
**मुंबई / प्रतिनिधी**
: नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांकरिता संकेतस्थळावर फक्त नामनिर्देशनपत्र व शपथपत्रातीलच माहिती भरणे आवश्यक आहे. त्यासोबत कोणतेही कागदपत्रे सादर (अपलोड) करण्याची आवश्यकता नाही. संकेतस्थळावर संपूर्ण माहिती भरलेल्या नामनिर्देशनपत्राची आणि शपथपत्राची छापील प्रत (प्रिंटआऊट) घेवून व त्यावर सही करून आवश्यक कागदपत्रांसह तो संपूर्ण संच संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे विहित मुदतीत जमा करणे आवश्यक आहे, असे स्पष्टिकरण राज्य निवडणूक आयोगाने केले आहे.
राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींच्या सदस्यपदासाठी आणि थेट अध्यक्षपदाच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता नामनिर्देशपत्र दाखल करण्यास सुरुवात झाली आहे. त्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने https://mahasecelec.in हे संकेतस्थळ विकसित केले आहे. त्यावर नोंदणी करून नगरपरिषद व नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी उमेदवारांना नामनिर्देशनपत्र आणि शपथपत्रातील माहिती भरणे आवश्यक आहे. परिपूर्ण माहिती भरल्यानंतर संकेतस्थळावरून त्याची मुद्रित प्रत (Print Out) काढून त्यावर उमेदवाराची स्वतःची व सूचकांची स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्यानंतर त्या मूळ प्रतीसह अन्य आवश्यक कागदपत्रांचा (उदा. नगरपरिषद/नगरपंचायतीचे नादेय प्रमाणपत्र, शौचालय वापराबाबतचे प्रमाणपत्र किंवा स्वयंघोषणापत्र, निवडणुकीसाठी बँक खात्याचा तपशील, राखीव जागांवरील उमेदवार असल्यास जातप्रमाणपत्र, पक्षाचा उमेदवार असल्यास 'जोडपत्र-१' किंवा 'जोडपत्र- २ इत्यादी) संपूर्ण संच विहित मुदतीत संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे दाखल करणे बंधनकारक आहे.
इच्छूक उमेदवारांना नोंदणीसाठी सुरुवातीपासून सुरू केलेले संकेतस्थळ १७ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत २४ तास सुरू असेल. तोपर्यंत त्यावर इच्छूक उमेदवारांना कोणत्याही वेळी नोंदणी करता येते व नोंदणी करताना तयार केलेला लॉगीन आयडी व पासवर्ड आपल्याकडे जपून ठेवावा लागतो. कारण नामनिर्देशनपत्र आणि शपथपत्रातील माहिती भरण्यासाठी ते आवश्यक असते. सही केलेल्या प्रिंटआऊटसह आवश्यक त्या संपूर्ण कागदपत्रांचा संच संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला विहित मुदतीत म्हणजे १७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत दुपारी ३ वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. सर्व कागदपत्रांसह नामनिर्देशनपत्र शनिवारी, १५ नोव्हेंबर २०२५ या सुटीच्या दिवशीसुद्धा स्वीकारण्यात यावेत, अशा सूचना सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत. मात्र रविवारी (ता. १६ ) ते स्वीकारण्यात येणार नाहीत. इच्छूक उमेदवारांना आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देण्याचेही निर्देश सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतींना देण्यात आले आहेत, असे राज्य निवडणूक आयोगाने प्रसिद्धिपत्रकाद्वारे कळविले आहे.

# पनवेल शहर पोलिसांनी केला वैष्णवी कडू हिचा विशेष सत्कार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल,वार्ताहर** भाजपचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्षगणेश कडू यांची कन्या वैष्णवी कडू हिने फ्लोरिडा येथील मायामी एव्हिएशन संस्थेत कमर्शियल पायलटची ट्रेनिंग पूर्ण करून ती कमर्शियल पायलट बनली आहे. याबद्दल तिचा पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी विशेष सत्कार करून तिचे कौतुक केले . यावेळी पोलीस हवालदार माधव शेवाळे , गणेश कडू , दिलीप देशमुख, हसमुख वनवेरु आदींनी तिचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

